४०९

म.ग्रं.सं. ठाणे
विषय : काव्य
सं. क्र. : ४०९

१. उमाणी

REFBK-0006418
REFBK-0006418

वा. भ.
६४९८
२०६३

# काव्य-प्रभा

प्रभाकर दिवाण

काव्य ५८

REFBK-0006418

दा. क्र. ६४९८

संग्रह शाखा

सन १९४३ ] किंमत १ रुपया [ शके १८६५

प्रकाशक
**प्रभाकर दिवाण**
सेवाग्राम (वर्धा).

मुद्रक—
**गो. भा. जोशी**
भास्कर छापखाना, वर्धा.

# प्रास्ताविक

मनुष्याच्या जीवनांत एक काळ काव्याचा असतो. त्या वेळीं काव्य-रचना न करणारा मनुष्य विरळा. साहित्यिक अभिरुचि असलेला तरुण ह्या काळांत शेंकडो कविता लिहून टाकतो. ह्यापैकीं बहुतेक कविता साधारणतः टाकाऊ असतात हें खरें असलें तरी काव्याच्या सदरांत पडण्यासारख्या देखील बऱ्याचशा कविता त्यांत आढळून येतात.

आठ दहा वर्षांपूर्वीं अशाच काव्यदशेंत असतांना मी उत्साहाच्या भरांत पुष्कळशा कविता लिहिल्या. आज त्यांच्याकडे तिऱ्हाइताच्या दृष्टीनें पाहण्याचा मी प्रयत्न केला व त्यापैकीं बऱ्या वाटणाऱ्या कविता निवडून काढून माझ्या काव्यरसिक मित्रांना दाखविल्या. त्यांना त्या पसंत पडल्यामुळें आज त्या पुस्तक रूपांत बाहेर पडत आहेत. 'सर्वं कान्तमात्मीयं पश्यति' हें वचन लक्षांत घेतल्यास मित्रांच्या पसंतींत कवितांच्या चांगुलपणापेक्षां आपले–पणाचाच भाग जास्त असण्याचा विशेष संभव आहे. ह्यामुळें सर्वच काव्यरसिकांना त्या आवडतील असें म्हणतां येणार नाहीं.

आचार्य काकासाहेब कालेलकर पुस्तकाला प्रस्तावना लिहिणार होते. प्रस्तावना लिहिण्याच्या तयारींत असतांनाच ता. ९ आगस्ट १९४२ चा दिवस उजाडला व त्यांची तुरुंगांत रवानगी झाली. दोन तीन महिन्यानंतर सरकारकडून त्यांना प्रस्तावना लिहिण्याची परवानगी मिळाली व त्याप्रमाणें प्रस्तावना लिहून ती त्यांनीं माझ्याकडे

पोस्टानें रवाना केली. परन्तु मला मात्र ती मिळाली नाहीं. ती मध्येंच कोठें कशी गहाळ झाली याचा कांहींच पत्ता न लागल्यामुळें त्यांच्या प्रस्तावनेवांचूनच पुस्तक प्रकाशित करावें लागत आहे.

माझे आत्मीय मित्र, गुजराथ विद्यापीठाचे चित्रकार श्री. दत्तोपन्त गद्रा यांनीं वेष्टनावरील सुन्दर चित्र काढून पुस्तकाच्या सौंदर्यांत भर टाकली व माझे मित्र, भास्कर छापखान्याचे मालक श्री. गोविंदराव जोशी यांनीं आपले-पणानें पुस्तकाचें मुद्रण केलें. पुस्तक-प्रकाशनाच्या कामीं इतरांचें ही अनेक प्रकारें साहाय्य झालें आहे. ह्या सर्वांचें मी मनःपूर्वक आभार मानतों. आचार्य काकासाहेब कालेलकरांनीं अनेक विलक्षण अडचणींना तोंड देऊन प्रस्तावना लिहून दिली (प्रस्तावना मिळाली नाहीं हा अर्थात् परिस्थितीचा दोष आहे.) ह्याबद्दल त्यांचे जितके आभार मानावे तितके थोडेच आहेत.

**सेवाग्राम**
चैत्र पौर्णिमा
**शके १८६५**

**प्रभाकर दिवाण**

# अनुक्रमणिका


| विषय | पृष्ठ |
|---|---|
| १. शरद् | १ |
| २. सुमनांनीं कुंज फुले | २ |
| ३. प्रभात-बाला | ३ |
| ४. अगाध कांहिं तरी | ५ |
| ५. वाजवीं वंशि वनमाली | ६ |
| ६. प्रातःकाळीं | ८ |
| ७. गंगेच्या घाटावर | १० |
| ८. मृत्यु | १२ |
| ९. धर्म आणि अधर्म | १८ |
| १०. नदीकांठीं | २१ |
| ११. वाटसरू | २५ |
| १२. दोन भावांची गोष्ट | ३१ |
| १३. कोकिळेस | ३८ |
| १४. तिरंगी ध्वज | ४२ |
| १५. दुंदुभी हा धडधडे | ४३ |
| १६. वंद्य विभूति | ४४ |
| १७. हिन्द वन्दन | ४६ |
| १८. दिन ते निघून गेले | ४७ |
| १९. होऊं नको हताश | ४८ |
| २०. हाक | ५० |
| २१. आतां | ५३ |
| २२. वशिष्ठ | ५५ |

| विषय | पृष्ठ |
|---|---|
| २३. चांदबिबी | ५६ |
| २४. जप्त आश्रम | ५७ |
| २५. महात्मा गान्धी | ५९ |
| २६. महात्मा गान्धी | ६१ |
| २७. मराठी | ६२ |
| २८. खय्याम | ६३ |
| २९. परलोक-प्रस्थित | ६५ |
| ३०. वैषम्य | ६६ |
| ३१. सांभळ्याचें गाणें | ६८ |
| ३२. अंतिम | ७१ |
| ३३. भिक्षेकरी | ७२ |
| ३४. भिकारीण | ७४ |
| ३५. अभागी | ७६ |
| ३६. मुसळधार जळ पडते | ७८ |
| ३७. जिवंत बुजगावणें | ८० |
| ३८. किसान | ८२ |
| ३९. गिरणी कामगार | ८४ |
| ४०. शेठ | ८५ |
| ४१. काय सखि गाउं तरी मी आज | ८६ |
| ४२. मजुर सुटति गिरणिंतुनी | ८७ |
| ४३. शेतकरी | ८८ |
| ४४. शेत खणत शेतकरी | ८९ |
| ४५. जीर्ण समाधि | ९० |
| ४६. सुख | ९९ |

विषय पृष्ठ


४७. आजार ९२
४८. बालिकेस ९३
४९. सुटी ९४
५०. नाविक ९६
५१. प्रश्न ९८
५२. गायकास १००
५३. कुठें ठेवुं मी तुका १०२
५४. विहरतें नभीं पाखरूं १०३
५५. कांहीं तरी १०४
५६. झोप १०५
५७. नवबाला १०६
५८. प्रतीक्षा १०८
५९. झुरणी ११०
६०. बागवानी १११
६१. अजि वाटतें उदास ११२
६२. नभांत कादंबिनी ११४
६३. व्यथा ११६
६४. गति कोणती मम जीवना ११७
६५. कोठला तरी ध्वनि ११८
६६. सत्कार ११९
६७. मज पाहतांचि १२०
६८. त्रुटित धारा १२१
६९. सुदिन १४०

मराठी ग्रंथ संग्रहालय
संग्रहालय ठाणे

## शरद

शरद ऋतु येत
मोद मनिं देत

मेघ नच अतां
कीं तडिल्लता
रमति तारक मजेत

नील नभ कसें
मुकुर हंसतसे
धवल कीं सुमनिकेत

अमल-जल-युता
स्रवति गिरिसुता
तरल नर्तन-समेत

सस्यश्याम ही
शोभते मही
मधु गारवा हवेंत

उडति खग वनीं
रमत सुख जनीं
डुलत मम हृदय-शेत

## सुमनांनीं कुंज फुले

सुमनांनीं कुंज फुले
आनंदें हृदय डुले

फिरति रमाणि उपवनीं
मुक्त हास्य मधु वदनीं
मंद मंद पदर हले

वेलि आणि त्यापरी
मोहति विभ्रम-भरीं
झुलति हळूं विटपदलें

झुळझुळती निर्झरिणी
रमति मुली अंगणीं
गाति गोड विगहकुलें

फिरण्या मी येत इथें
हेंच मला आवडतें
गवसे मज पुण्यबलें

## प्रभातबाला

आले होते निघूनि गेले
हळू हळू रजनींचे झेले
करूनि गंगेवरतीं स्नान
मंद मंद चाले पवमान
नेसुन उंची शालदुशाला
हांसत आली प्रभातबाला

नानावर्णी सुमगुच्छांनीं
घाली नव वेणी वनराणी
विहंग अपुलीं गाती गाणीं
पानांवरुनी टपके पाणी
विकसद्-वदना गुलाबगाला
हांसत आली प्रभातबाला

श्वेत धुक्याच्या शय्येवरुनी
भानुबाल उठला तरतरुनी
घेउनि फेनिल प्याला हातीं
सरिता त्याला पुढतीं जाती
कुटिल कुंतलीं श्यामितभाला
हांसत आली प्रभातबाला

## प्रभातबाला

होमधूम आकाशीं उठला
जगन्मुखावर विकास फुटला
मरंद चंचरिकांनीं लुटला
आलोकाचा घोडा सुटला
गंधजयन्ती घालुनि माला
हांसत आली प्रभातबाला

ग्रंथ संग्रहालय
नं. ५/०४ ता. ७२३
ठाणे.

## अगाध कांहिं तरी

अगाध कांहिं तरी
असे हें अजरामर सुंदरी

व्योम जाहलें अथांग सागर
फिरती उर्मिल तयांत जलधर
विजा चमकती जणुं कीं जलचर
संतत सिंचिति सरी

तुडुंब भरलीं तळीं शिगोशिग
वृक्षहिं भासति पाण्याचे ढिग
जलमय अवघें चहूंकडे जग
सागर पृथ्वीवरी

नभांत तुंबे धुंद जलोदय
धरणीवरतीं एक पयच पय
व्योमधरा जाहलीं एकमय
अवनि गमे अंबरीं

## वाजवीं वंशि वनमाली

मधुर—रव—शाली
वाजवीं वंशि वनमाली

अनिल मंद मधुगंध चालला
विद्रुम—पल्लव—वृंद हालला
खेळति लहरी मुग्ध चंचला
सरोवर भालीं

उषारुणांचें हृदय मिळालें
आनंदाचे अश्रु गळाले
अंधाराचे मेघ पळाले
गुहांच्या खालीं

मोदभरानें फुलें हांसती
विहग लतांचे वरी नाचती
मंजुल गीतध्वनी सांचती
सृष्टि ही धाली

उजळ जाहलीं दिग्वदनें हीं
कान्ती मोहक फांके देहीं
पूर्व दिशेच्या गालीं येई
गुलाबी लाली

## वाजवी वंशि वनमाली

जिकडे तिकडे प्रसन्न सृष्टि
पाहुनि होते मोहित दृष्टि
त्यांत दवाची होउन वृष्टि
टवटवी आली

गुंजति मंजुल गीतें भृंग
वृषभ घांसती अपुलीं शृंग
करुनि वांसरें शेपुट तुंग
धांवतीं झालीं

विश्वामध्यें आनंदाचा
सौंदर्याचा मांगल्याचा
उचंबळे हा सागर साचा
मधुर हिमशाली

दुःखित माझें हृदय ओढुनी
काढ कुडीचें कवच फोडुनी
फेकुन दे ह्या नंदित भुवनीं
गीत वर घालीं

## प्रातःकाळीं

नीरनिधीच्या पलीकडूनी येत असे हा कोण बरें
सुवर्णकुंतल जगिं विखरें
दिशामुखांच्या गालांवरतीं आणित लाली कोण फिरें
अंबर चोंहिकडे पसरें
विहंग विरुतें काढुनि मुरली वाजवि अपुली मंद स्वरें
वदन कुणाचें हें हंसरें
नव पुष्पांचे हे हार कोण गुंफितो
मधुगंधि समीरण कोण इथें फुंकितो
जलतलीं कोण हीं कमलें आलिंगितो
मंदपणें स्वच्छंदपणें हा नाचत येतो कोण बरें
झणझणवित किंकिणी स्वरें

फेकुनि घुंगट कोण चलांचल मदचंचल हा जात असे
मुग्धपणें स्मित करुनि हंसे
तुंग गिरीच्या शिखरावरतीं जाउनि बघ हा कोण बसे
नेत्रीं चंचलता विलसे
धरणीवरुनी स्वच्छ वाहती निर्झर कलकल करित जसें
कोण काढितो सूर तसे

प्रातःकाळीं

हा कोण दही घ्या म्हणुनी ललकारतो
हा कोण झाडुनें रस्ता बत्र झाडतो
हा कोण दुधाची धार आणि काढतो
आकाशाच्या पलीकडूनी कपोल चुंबित अंबुजसे
कोण हळुंच हा येत असे

स्नान करूनी गात चालली कुंकुम लेवुनि ही भालीं
कुठें बरें पैंजणवाली
सडा घालुनी त्यावरि सुंदर अंगणिं रांगोळी घाली
कोण दाखवी गजचाली
दारामध्यें उभी राहुनि चुंबी बालक ही गालीं
काय बघायाला आली

अंगणें गोमयें अपुलीं संमार्जिलीं
अभ्यंग स्नानें केलीं सुरभित जलीं
भूषणें घातलीं नक्षत्रें चमकलीं
मुक्तकुंतला कुंद मुखामधिं जणूं विकसली रदनाली
कुठुनी ही देवी आली

## गंगेच्या घाटावर

समोर माझ्या लाटा आनंदानें
हांसति नाचति गाती मधुमय गानें
गंगेच्या ह्या सुनील वक्षावरतें
नौकातति ही मोदभरें वावरते

वल्हीं झपझप मारित शौकी लोक
नेती ओघाउलट नाव निर्धोक
पाणी तीवर आपटतें जोरानें
होती त्याचीं शुभ्र पांढरी पानें

बगळ्यांची ही सुंदर ढवळी रांग
लपलप पंखें करीत उजळी आंग
नील अंबरांतून अहा आनंदें
उडत चालली वदत नदीला 'वंदे'

पैल तिरांवर वाळवंट विस्तीर्ण
पसरुन आहे शुभ्र रेतिनें कीर्ण
उतरत रविच्या तेजें तें भरपूर
चमके वाटे पसरे सुवर्ण चूर

त्याच्यामागें शेतें हिरवीं गार
पाहुनि आत्मा होतो गारीगार
मन्नयनांच्या अंताच्या पर्यंत
आंथरलेलीं दिसतीं प्रमोवंत

## गंगेच्या घाटावर

बागा मधिंमधिं लावियल्या रसिकांनीं
कलरव होतो मोटांचा त्यांतूनि
त्यांतिल पुष्पां झोके देतां देतां
गुंगुनि येते मंद गती मधुवाता

मध्यें मध्यें गंगेच्या घडियालें
काळीं काळीं उलटुन जाती खालें
आनंदानें उडविति पाणी बालें
ओरडती कटु कठोर डोंगीवाले

बसुन अहिल्याघाटीं संध्या समयीं
बघतों सारी सृष्टी ही मोदमयी
परंतु माझें मानस उदास कां हें
म्लान विचारीं या वेळीं अवगाहे

दडपे माझें अंतर जणु दुःखौघें
गळुनी पडती हात पायही चौघे
खिन्नपणानें आनन झालें म्लान
अंतरांत शोकाचें चाले गान

आहे जनता आनंदित ही सारी
कारण प्रेमाचें तिज मिळतें वारी
परन्तु माझा प्रेमी तूझेवीण
आहे विश्वेश्वरा दूसरा कोण

## मृत्यु

जेवून थोडा निजलों प्रशान्त
मनांत भीति नव्हती कशाची
म्हणून झाला झणिं जागरान्त
निद्रा बहू लागलि गाढ साची

जाते न थोडी घटका निघून
दारावरी बैसलि तोंच थाप
उठें खडाडून तिला श्रवून
गेली अशी मोडून गोड झोप

कसे बुवा झोप न घेउं देती
असें जरा बोलत कोपुनी मी
जोरांत दारें उघडीं तदा तीं
जरी असे मत्प्रकृतीहि धीमी

समोर तों तिष्ठत डाकवाला
बघून झाला मज हर्ष फार
कांहीं समाचार असेल आला
आनन्ददायी म्हणुनी तयार-

केला पुढें उत्सुक हात वेगें
त्यानें दिला एक मला लखोटा
गेला 'असे तार' म्हणूनि मागें
झाल्या मनिं चालु विचारलाटा

# मृत्यु

आली मला आजवरी न तार
म्हणूनि भीती बहुला उदेली
लागे धडाडूं हृदयांत फार
घामामुळें काय भिजून गेली

सकंप हस्तें उघडीं लिफाफा
तयांत होतें लिहिलें सुरेख
' येईन मी लेउन रात्रि साफा '
झालोंच मी मूढ बघून लेख

येणार तो कोण अणी कुठून
कांहींच नाहीं लिहिलें तयांत
असेल कोणी अपुलाच आप्त
कल्पून ऐसें बसलों निवांत

झाली निशा चोंहिकडे तमिस्र
विस्तारलें मन्मनिंही तसेंच
रत्नें उदेलीं नभिचीं सहस्र
पडे करूं काय म्हणून पेंच

जशी जशी रात्र निघून गेली
वाढे तशी मन्मनिं उंच भीति

## मृत्यु

कित्येकदां मी नयनेंहि नेलीं
रस्त्याकडे ती बघण्यास मूर्ति

झाले दहाही अकरा नि बारा
आलें न कोणी तरि तेवढ्यांत
गाड्याहि गेल्या सगळ्या भरारा
येणार ना कोणि म्हणून आंत-

जाणार मी तोंच समोर आली
मंदार मालेंतिल सौरभानें
भरीत दाहीहि दिशा बनाली
मूर्ती सुधा वर्षत आननानें

व्यमोदरानील शरीर—कान्ति
ओठावरी लालि गुलाबशाली
नेत्रीं असे भव्य असह्य तेज
औन्नत्य होतें सुतमाल—भाली

बवूनि दिव्यांबर दिव्य माला
हेमप्रभा—भूषित रत्नमौली
तनुप्रभा—नष्ट—तमिस्रजाला
विनम्र झाली मम तोंच मौली

## मृत्यु

तदा शरच्चन्द्र–मरीचि–धाम
मन्दस्मितानंतर कानिं आली
पीयूष–वर्षावचोभिराम
वाणी तदा मन्मति लीन झाली

" मृत्यु असें मी तुज न्यावयातें
आलों असें आटप सर्व कांहीं
माझ्यापरी कोणि न सौख्यदातें
आहेच हें माहित तूजलाही

करीतसें मी अमर स्वभक्तां
रोगी जनांना करितों निरोगी
गातो सदा मद्गुण सत्यवक्ता
ध्यातो मला निर्भय रोज योगी

भीती वृथा माझि धरी विमूढ
असें खरा मी अभयप्रदाता
आहेत कांहीं जगतांत गूढ
स्वभाव ते लागति नाच हाता"

ऐकून मी गर्भगळीत झालों
छाती उडूं लागलि हात हात

# मृत्यु

बोलावयातें रसना न चाले
झाला सदाचा मम हाय घात

धैर्यास कांहीं धरुनी करांतें
जोडून बोलें मग दीनवाणें
प्रभो तुझें वाक्य खरेंच सारें
ऐकें परन्तू मम एक गाणें

येण्यास मी सज्ज असें तथापि
माझ्याविना पोशिल कोण बाल
ह्यांची तुवां माय कधींच नेली
घालील ह्या कोण नि भात-डाळ

मी आणिलें त्यांस जगामधें यां
जाईन टाकून जरी असाच
माझ्यापरी मीच कृतघ्न, माया
ह्यांची न तोडीन कधींहि साच

आहेत सन्यासि कितीक येथें
पत्नी शिशूंना करुनी भिकारी
गेले घरा सोडुन निर्घृणांतें
धिक्कार हा त्यांस सहस्रवारी

## मृत्यु

आली मला आजवरी न तार
म्हणूनि भीती बहुला उदेली
लागे धडाडूं हृदयांत फार
घामामुळें काय भिजून गेली

सकंप हस्तें उघडीं लिफाफा
तयांत होतें लिहिलें सुरेख
‘ येईन मी लेउन रात्रि साफा ’
झालोंच मी मूढ बघून लेख

येणार तो कोण अणी कुठून
कांहींच नाहीं लिहिलें तयांत
असेल कोणी अपुलाच आप्त
कल्पून ऐसें बसलों निवांत

झाली निशा चोंहिकडे तमिस्र
विस्तारलें मन्मनिंही तसेंच
रत्नें उदेलीं नभिचीं सहस्र
पडे करूं काय म्हणून पेंच

जशी जशी रात्र निघून गेली
वाढे तशी मन्मनिं उंच भीति

## मृत्यु

कित्येकदां मी नयनेंहि नेलीं
रस्त्याकडे ती बघण्यास मूर्ति

झाले दहाही अकरा नि बारा
आलें न कोणी तरि तेवढयांत
गाड्याहि गेल्या सगळ्या भरारा
येणार ना कोणि म्हणून आंत-

जाणार मी तोंच समोर आली
मंदार मालेंतिल सौरभानें
भरीत दाहीहि दिशा वनाली
मूर्ती सुधा वर्षत आननानें

व्यमोदरानील शरीर—कान्ति
ओठावरी लालि गुलाबशाली
नेत्रीं असे भव्य असह्य तेज
औन्नत्य होतें सुतमाल—भाली

बघूनि दिव्यांबर दिव्य माला
हेमप्रभा—भूषित रत्नमौली
तनुप्रभा—नष्ट—तमिस्रजाला
विनम्र झाली मम तोंच मौली

ग्रं. ... क्र. ...
ता. ...
ठा. ग्रं.

## मृत्यु

तदा शरच्चन्द्र–मरीचि–धाम
मन्दस्मितानंतर कानिं आली
पीयूष–वर्षाववचोभिराम
वाणी तदा मन्मति लीन झाली

" मृत्यु असें मी तुज न्यावयातें
आलों असें आटप सर्व कांहीं
माझ्यापरी कोणि न सौख्यदातें
आहेच हें माहित तूजलाही

करीतसें मी अमर स्वभक्तां
रोगी जनांना करितों निरोगी
गातो सदा मद्गुण सत्यवक्ता
ध्यातो मला निर्भय रोज योगी

भीती वृथा माझि धरी विमूढ
असें खरा मी अभयप्रदाता
आहेत कांहीं जगतांत गूढ
स्वभाव ते लागति नाच हाता"

ऐकून मी गर्भगळीत झालों
छाती उडूं लागलि हात हात

## मृत्यु

बोलावयातें रसना न चाले
झाला सदाचा मम हाय घात

धैर्यास कांहीं धरुनी करांतें
जोडून बोलें मग दीनवाणें
प्रभो तुझें वाक्य खरेंच सारें
ऐकें परन्तू मम एक गाणें

येण्यास मी सज्ज असें तथापि
माझ्याविना पोशिल कोण बाल
ह्यांची तुवां माय कधींच नेली
घालील ह्या कोण नि भात-डाळ

मी आणिलें त्यांस जगामधें यां
जाईन टाकून जरी असाच
माझ्यापरी मीच कृतघ्न, माया
ह्यांची न तोडीन कधींहि साच

आहेत सन्यासि कितीक येथें
पत्नी शिशूंना करुनी भिकारी
गेले घरा सोडुन निर्घृणातें
धिक्कार हा त्यांस सहस्रवारी

## मृत्यु

नको मला स्वर्गसुखें अमूप
मुळांमधें त्याहुन ज्यास्त, सौख्य
यांच्या अहा मुग्ध वचांपुढें तें
पीयूषही होय अतीच तुच्छ

ऐकून हें हांसत मन्द मन्द
बोले पुन्हां मृत्यु " तुझ्याहुनी रे
आहे जगत्पालक तो कृपाळू
बाळां सुधेचे पुरवील चारे "

बोलूनिया 'ऊठ' करास माझ्या
त्यानें धरीलें उठलों तसा मी—
झोपेंतुनी, तों मज दृष्टि आले
सुवर्ण रश्मी रविचे स्वधामीं

विहंगमांच्या मधु कूजनाची
लकेर आली मम आणि कानीं
होतें अहा स्वप्नच सर्व कांहीं
आलें तदा हें मम सर्व ध्यानीं

## धर्म आणि अधर्म

हिन्दु मुसलमान् दंगा मोठा झाला
घालिति एकामेकांवर ते घाला
निघून गेली माणुसकी त्यांमधुन
जो तो होता नाचत जीवां वधुन

उग्र रानटी पशूंप्रमाणें नेत्र
हातीं होते कट्यार भाले वेत्र
अरि–नरडीचा घोट घ्यावयाला ते
दैत्यापरि आवेशें धांवत होते

सज्जन साधू विनविती साऱ्या लोकां
सोडुन द्या ही पशुता हाता रोका
व्यर्थ परी तें झालें सारें कांहीं
कलह पेटला आणि दिशांना दाही

भीषण झाला सुरू मनुज–संहार
अनाथ बालक रमणी झाल्या ठार
घरें जाहलीं आगीनें किति खाक
उडूं लागली आणि चितेची राख

एका अनाथ हिन्दु स्त्रीच्या मागें
हिंसक मुस्लीमांचा जमाव लागे

## धर्म आणि अधर्म

दीन बापडी जीव वांचवायाला
घरांत एका शिरली ती भयशबला

गरीब तेथें कृषक मुसलमान् एक
रहात होता धार्मिक सात्विक नेक
वदला तो तिज जाई येथुन बाई
रक्षण तूझें येथें होणें नाहीं

घेतीलच ते प्राण तुझा अजि आणि
ठार मारतिल मजला बकऱ्यावाणी
कृपा करूनी जाई आणिक कोठें
नको पाप हें लादूं मजवर मोठें

काय अतां ती उत्तर देइल त्याला
वदली केवळ अश्रुलोचनें अबला
सारें अल्लाचेच असति ना बाल
भीतिमुळें मग धर्म काय सोडाल

त्याच्या अन्तःकरणाला हलवून
वीज तत्क्षणीं गेली ती चमकून
भीतिमुळें निज धर्म काय सोडाल
ह्या वचनें तद्हृदीं पेटला जाळ

## धर्म आणि अधर्म

कर्तव्याच्या नवीन एका तेजें
वदनीं त्याच्या दैवी शान्ति विराजे
बोले तो निज धर्म कसा सोडीन
हृदय न माझें इतकें देवी हीन

तिला सुरक्षित लपवुन अपुल्या गेहीं
निघे वीर तो बाहेरीं सत्स्नेही
येतच होता क्षुब्ध जनांचा लोट
घेण्याला त्या स्त्रीनरडीचा घोट

जघन्य कृत्यापासुन त्या लोकांस
परावृत्त करण्याचे किती प्रयास-
केले त्यानें परन्तु सारें फोल
उलट क्रुद्ध लोकांचा सुटला तोल

वीर कृषक आडवा तयांना आला
लाठ्यांचा तों पडला त्यावर घाला
भूमि रंगली त्याच्या नव रक्तानें
मीही आतां संपवितों हें गाणें

नाहीं, परि हें राहिलेंच कीं आहे
काफर ऐसें नांव तिथें तो लाहे

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ६५७८

## नदीकांठीं

नदी चालली वेगामध्यें
वरुनि चंद्रचंद्रिका झरे
मीही होतों बसलों काठीं
भान, बघुन तें, मम विसरे

तुषार होते उडत सुशीतल
मंद पवन चालला असे
शान्ति जणूं मूर्तिमंत होई
दिव्य कुणी वा बाल हंसे

जसे जसे तरु-पल्लव हलती
मर्मर रव स्वर्गीय उठे
कलकल चाले जललहरींची
श्वेत फेन उसळून फुटे

रजतधवल चंद्रिका तयावर
टाकी अपुलें दिव्य हसें
तदा लोचनें भारुन जातां
मर्त्य सृष्टिचें स्मरण नसे

शांत अशा त्या समयिं अकस्मात्
मम हृदयांतुन दिव्य कुणी

## नदीकांठीं

देवी निघुनी मंदपणें ती
लागे जाउं नदीवरुनी

शांत मनोमोहक वदनाची
कांति तिथें पसरुन गेली
शुभ्र वसन हळुं हळुं तें हाले
रुळति लांब कुंतल वेली

अंगापासुन निच्या स्वर्गिचा
सौरभ तो तेथें चाले
फुल्ल फुलांची माला तिचिया
गौर उरोदेशीं हाले

अनिमिष नयनांनीं मी तिजला
विस्मययुत पाहत होतों
दिव्य अप्सरा कोण इथें ही
आली हें पाहत होतों

तोंच तिची स्वर्गीय तंत्रिका
तिथें झणीं झणूझणुं लागे
स्वर्ग धरेवर आला तेव्हां
मृत्यूचे तुटले धागे

## नदीकांठीं

मागें पुढतीं वरी खालतीं
दैवी ध्वनि भरुनी गेला
ब्रह्माण्डाचा गोल डोलतो
नाचे अब्धींचा मेळा

मीपण नुरलें माझें कांहीं
मिसळुन मी विश्वीं गेलों
मरुनी झालों जिवंत आणिक
जिवंत होउन मी मेलों

हळूंहळूं ती चालत चालत
नदींत अंतर्हित झाली
माझी दृष्टी मला मिळाली
मरणाची वृष्टी झाली

उदास पांडुर ज्योत्स्ना भोंतीं
पडली होती अनिल फुटे
म्लानपणें मी प्रश्न करीं
ती कोण कोठली गेलि कुठें

नदींतुनी कलकल रव चाले
आकाशांतुन शून्यपणा

होई मर्मर ध्वनी तरूंचा
पृथ्वी ही जाई मसणा

नाहीं कुठुनी उत्तर आलें
वाजे ना तो दिव्य ध्वनी
माझ्या मनिं तंत्री ही वाजे
तुटक्या तारा फुटके मणी

## वाटसरू

हाहाकार चौंहीकडे खालींवर
तापलेली धूळ भर भर उडे
नदीकांठ शुष्क नाहींत धीवर
लाही लाही जीव करी मागेंपुढें

वाटतसे जणूं सूर्य जीव लोक
जाळूनिया आतां करितो कीं खाक
फुटूनिया जणूं उठलासे शोक
घरघर करी जगताचा आंख

एकटाच नाहीं बंधु ना बहीण
चाले वाटसरू म्लानमुख मूक
ऊन चौंहीकडे उदास नि क्षीण
गळ्यामधें जणूं अडकला हूक

चालला पथिक तहान ना भूक
फडफडे उंच शुष्क तालवन
भयाण पसरे वाळू रुखरूख
एखादा मधूनि जाई खंडघन

डहाळ्यांमधूनि उदास ओरडे
कावळा आपला उदासीन स्वर

## वाटसरू

उंच आकाशांत घार खूप चढे
कर्णकटु तिची चिर्र उठे वर

खांद्यावर जड पथारी आपुली
एका हातामध्यें भरलेला लोटा
धुळीनें माखला जणूं काय कुली
चालला पथिक हातामधें सोटा

नाहीं श्रम कांहीं एकटा विरागी
ऊन ना पाऊस चाललाच आहे
सूर्य डोक्यावर बिचारा अभागी
झळा लपकती जाळ जणूं वाहे

ग्रीष्माचें साम्राज्य अफाट पसरे
पल्वलीं लोळती जंगली वराह
सारें वन खिन्न उदास मर्मरे
लिंपतसे जणूं आग गंधवाह

दिशा धग्धगती चुलीपरी साऱ्या
रस्ता झाला जणूं तप्त लोहपथ
संतप्त गिधाड करी येरझाऱ्या
पेटलासे दिसे रवीचाही रथ

## वाटसरू

तरीही आपला वाटसरू चाले
अमर्याद मार्गावरी त्याचें लक्ष
पथारींत डबा खडखड हाले
घामाचे ओघळ भिजविती वक्ष

सूर्य उतरला परतल्या गाई
कृषक आपुले सोडती नांगर
घरीं जाया साठीं चाललीसे घाई
पीत रवि दिसे पिकलें डांगर

पेंढया काढतांना कडब्याचे गूड
मर्मरूं लागले कृषक-हातांनीं
फोडतात कोणी जळणास सूड
गाती रस्त्यावरी मुली सांजगाणीं

घणघण घंटा देवळांच्या आंत
गाजवूं लागल्या आरतीचा ध्वनि
लावायास देवापाशीं तेलवात
मंदिरपथानें चालल्या साजणी

सनईचे सूर दशदिशांतरीं
स्वर्गीय शांतता झुळझुळवीत

## वाटसरू

अनंतांत होती विलीन नंतरीं
सुरूं झालें मंद संध्येचें संगीत

धूपांचा मधुर सुटला सुवास
आकाशीं अंतिम लालिमा फुटला
अंधकाररूपी रजनीचा हास
दिगंत फाडूनि हळूंच उठला

वाटसरू शांत निर्विकार मनें
समोर सरळ चाललाच आहे
तमोमय झालीं भोंवतालीं वनें
चालला आपला मागुतीं न पाहे

कोणी तयावर टाकिली मोहिनी
कोठला निशीथदीप बोलावितो
कोणाच्या पायींचा नुपूर झिन्झिनी
अंतःस्थल त्याचें हळू हेलावितो

वाटसरा असा कुठें चाललास
संपेल ही तुझी कधीं मुशाफरी
डिडांग वाजतो देवळांत तास
चितेचा प्रकाश उठे कोठें तरी

## वाटसरू

बोल ना उत्तर निस्तब्ध चालला
मंद मंद शीत वारा वाहूं लागे
समुद्र भैरव रवें फेंसाळला
घुबड ओरडें होऊनिया जागें

ना एक ना दोन चाले वाटसरू
वाऱ्यानें धूसर केस भुर्भुरती
लपलपे उंच कोठेंतरी सरू
चमकती श्वेत तारकांच्या तति

बहीण ना बंधु सोबत ना मित्र
नीरव निशीथीं एकटाच एक
काळाच्या पडद्यावरचें कीं चित्र
मूर्तिमंत किंवा चितेंतील शोक

कोणाचें तयाच्या दृष्टीं कर्णफूल
दिसली खिडकी उघडी कुणाची
कुणाच्या रथाची झळकली झूल
कुणाची सिंजिली कांची सुवर्णाची

नाहीं आशा-खेद नाहीं चिंता-मोद
जगताची सर्व तोडिलीं बंधनें

## वाटसरू

अश्रांत चालला नसे अवरोध
माया-ममतेची पेटलीं इंधनें
निर्झरांचें चाले मधुर संगीत
सुगंधें भरलें सरितांचें तीर
चंद्रिकेनें झालें विश्व धवलित
चालला एकटा फंदी मुशाफीर

मराठी ग्रंथ सं...
ग्रा. नं.
ता.
ठाणें.

## दोन भावांची गोष्ट

होते साधे प्रेमळ दोघे भाऊ
गोष्ट तयांची थोडी आतां गाऊं
आज चांदणें पडलें आहे छान
हंसतें आहे मोदभरानें रान
ओढा वाहे संथपणें अम्लान
लावा माझ्या गाण्यावरतीं कान

एक विवाहित भाऊ त्याचे कुंजीं
घालित होते मिलिंद अपुली रुंजी
मुलामुलींनीं भरलें त्याचें गेह
प्रमोद हांसे उसळे भंवतीं स्नेह

दुसरा होता केवळ एकच जीव
अफाट सिंधूमधील कीं राजीव
दोन्ही भाऊ वसती आनंदानें
फुललीं सुंदर जशीं दोन फुलदानें

एक तयांचें होतें छोटें शेत
राबति त्यावर दोघे ते समवेत
निघे उषेची लाली त्यांची तेथें
तिथेंच त्यांना प्रेमें संध्या भेटे

## दोन भावांची गोष्ट

सुपीक अपुली भूमी केली त्यांनीं
अपुल्या निढळावरील शीत जलांनीं
आलस्याला तेथें नव्हता थारा
सोसत नाहीं त्यास वनांतिल वारा

दिनभर शेतावरी सक्त कष्टावें
संध्याकाळीं घरीं सुखानें यावें
स्तवन करावें परमेशाचें आणि
पुन्हां उठाया सुखनिर्भर झोपावें

अखंड त्यांची होती दिनचर्या ही
नव्हतें त्यांना तेथें कमती कांहीं
अपुल्या भूमीचे ते होते राजे
सदा तयांच्या वदनीं शांति विराजे

रंगविलेले पररुधिरानें लाल
उठवावे निज वैभवलोल महाल
जीवावर गरिबांच्या चैन करावी
प्रतिभा ऐसी नव्हती त्यांच्या गावीं

भूतदयेच्या उज्वल नांवासंगें
निज ललनांना शिवणें तलम लहंगे

## दोन भावांची गोष्ट

पाय शेंकणें चितेंतल्या ज्वालेंत
नव्हती त्यांना ललितकला ही येत

धर्म ठेविला नसे मंदिरीं त्यांनीं
अथवा सोडुनि दिला मोकळा रानीं
जीवनांत तो त्यांच्या होता मुरला
साखरपाकामधें मुरंबा चुरला

एका हंगामांत कांपुनी पीक
दोन तयाचे विभाग केले ठीक
पेंढ्या बांधुनि शेतामध्यें आणि
रचिल्या गंजी दोन व्यवस्थित त्यांनीं

त्या रात्रीं अविवाहित बंधुवराला
एक चांगला विचार चित्तीं आला
मी तर आहे एकटाच मज कांहीं
पोसायाचें नाहीं कोणालाही

पुत्रकलत्रें असती मम भावास
द्यावा लागे त्यास तयांना घांस
तेव्हां त्याच्या इतका मी केव्हांही
वाटा घेणें योग्य खरोखर नाहीं

## दोन भावांची गोष्ट

काहीं पेंढ्या अपुल्या गंजींतून
द्याव्या त्याच्या गंजीवर ठेवून
त्याला नाहीं कांहीं हें कळणार
अशा प्रकारें आपण होऊं पार

मनामधें हा विचार त्याच्या येतां
तसाच गेला शेतीं तो सचिंता
पेंढ्या भावाच्या गंजीवर कांहीं
दिल्या ठेवुनी गुप्त तयें लवलाही

कारण त्याला माहित होतें ठाम
उघडपणें हें होणें नाहीं काम
आहे इतका बंधू मम सच्छील
कीं तो माझी इच्छा नाकारील

इकडे मोठा भाऊही त्या रात्रीं
जागा झाला आणि प्रियेला वदला
माझा भाऊ अविवाहित अन् तरुण
आणि कुणीही नाहीं सोबत त्याला

नसे कुणी जो त्याच्या कामामध्यें
करील त्याला प्रेमभरानें साह्य

किंवा शीतल आलिंगन देऊनी
हरील त्याचा थकवा अंतर्बाह्य

दुःखामध्यें धीर द्यावया कोणी
नाहीं त्याला प्रेमी जीव जगांत
किंवा आनंदाच्या मंगल वेळीं
मोद द्यावया मायेचा मधु हात

तेव्हां शेतांतूनी त्याच्या इतक्या
पेंढ्या घ्याव्या मी हें नाहीं युक्त
प्रिये जाऊं चल गंजीवरती त्याच्या
पेंढ्या कांहीं ठेऊन देऊं गुप्त

वदुनी ऐसे उठले ते पतिपत्नी
जाऊनि शेतावरि तें केलें काम
प्रेमाचा हा महिमा आहे ऐसा
प्रेमावांचुनि जीवन होय स्मशान

दुसरे दिवशीं भाऊ ते शेतांत
गेले गंजी बघुनि सारख्या आणि
चकित फार ते झाले परंतु त्यांच्या
आली नाहीं चमत्कृती ती ध्यानीं

## दोन भावांची गोष्ट

रोज ठविला क्रम तो त्यांनीं चालु
आणि शेवटीं एके दिवशीं त्यांचीं
मधेंच झाली भेट विस्मयानंदें
मिठी मारिली त्यांनीं प्रेमसुखाची

नयनांमधुनी अश्रु गळाले त्यांचे
हृदयाशीं तें हृदय मिळालें त्यांचें
प्रेमाचा तो संगम तेथें झाला
स्वर्ग घेरला आला चुंबायाला

सुगंध सुटला शीतल वारा उठला
प्रकाश चंद्राचा आकाशीं फुटला
पुष्पवृष्टि वेलींनीं तव्हां केली
सुधा भूवरीं मेघें ओतीयेली

ज्या भूमीवरतीं हा गोड विचार
आला त्या शुचि हृदयीं वारंवार
तेंचि ईश्वराचें आवडतें स्थान
प्रगटे त्याचें स्वयं तिथें महिमान

म्हणुनी पावन त्या जागेवर मूळ
उभारिलें त्या भावांनीं देऊळ

## दोन भावांची गोष्ट

प्रेमाच्या महिम्याचें शाश्वत गीत
गात असे तें रात्रंदिन अवनींत

प्रेमाचा जय धर्माचा जय बोला
जगदीशाच्या कर्माचा जय बोला
जय बोला त्या प्रेमास्पद भावांचा
जय बोला त्या मंगलमय नावांचा

होते साधे प्रेमळ दोघे भाऊ
पावन त्यांचें चरित्र आपण गाऊं

## कोकिळेस

आलिस तूं कोकिळे आपुली
आलापित पंचम मधु तान
भारुन टाकित जणुं जादूनें
अंतहीन हें विश्ववितान

तुझ्या दिव्य संगीतरवानें
अहा पालवी तरूस फुटली
स्वागतास तव अनंतरंगी
पताकावली कीं ही जुटली

आम्र जाहला प्रमुदित अगदीं
मंजरिकांनीं अभिनव फुलला
कोण जगांतिल मानव ऐसा
जो न सुगंधें त्याच्या भुलला

आलिस तूं परभृतिके आणी
अपुल्या कोमल करांगुलींनीं
हळुंच सृष्टिवरचें आच्छादन
दूर सारलें कमल-कळींनीं

अहा तोंच झांकिलीं वैभवें
जिकडे तिकडे प्रगट जहालीं

## कोकिळेस

प्रेमिजनांचीं सुधामीलनें
होउं लागलीं कुंजाखालीं

पोकळ विद्युद्दीपांमध्यें
आलोकाची ज्योत चेतली
मृत सृष्टीच्या कलेवरीं ही
जिवंत तेजोर्गाति पेटली

मदकल तरुणी वसन वसंतो
लेउनि फिरती रानोरानीं
खुडतीं पुष्पें खोंचति केशीं
गाती स्वैर तरंगित गाणीं

पुष्करिणींच्या तीरावरतीं
पाय घालुनी शीतल नीरीं
मौज करीती सखीजनांसह
उधळित हास्यविनोद—अमीरी

आलिस तूं परभृतिके आणी
तारुण्यें मुसमुसलें विश्व
वनें उपवनें नाचति हांसति
आली मादकता सृष्टीस

## कोकिळेस

कोण अससि तूं जादुकारिणी
गाशी पंचम परि ना दिससी
येशी जैसी तशीच जाशी
कां तूं केवळ स्वप्नच अससी

या तरुवरुनी त्या तरुवरतीं
नाद फिरे तव भारित जगती
हे मायाविनि गर्द झाडिमधिं
लपत छपत कां ऐशी फिरसी

उषा आपुलं सुवर्ण कुंतल
जधीं विंचरायाला बसते
उजेड अंधारांचें मोहक
धुकें जधीं चहुंकडे पसरते

अहा तदा तव नादमाधुरी
अर्धोद्घाटित कर्णकुहरिं मम
दुरून अगदीं अनंतांतुनी
शिरते कांहीं अमृतधारसम

कोठुन येशी जाशी कोठें
गान आणि कसलें हें गाशी

## कोकिळेस

न कळे कांहीं येथुन तेथुन
एक महा गूढच तूं अससी

कळेल कां मज कधीं तरी हें
वद सखये वद विश्वरोहिणी
अथवा असुं दे गा तूं अपुली
दिव्य मदोद्धत गीत–मोहिनी

हे कलकंठी अविकल पंथीं
काढित अपुली तान वसंती
ये परभृतिके उपवनकृतिके
परिहरिं माझी लवकरि खंती

## तिरंगी ध्वज

जगीं तिरंगी ध्वज हा लावूं
विजय मंजु नव गीतें गाऊं

पराक्रमाचें डुलतें डूल
आनंदाचें हंसतें मूल
स्वातंत्र्याचें फुलतें फूल
सदा ह्यास हृदयावर वाहूं

हिंदभूमिचा जीवनप्राण
संपत्तीचें अभिनव गान
गगनविहारी प्रेम विमान
रात्रंदिन मनिं ह्याला ध्याऊं

अमुच्या आत्म्यांची ही माला
उत्साहाची फेनिल हाला
चैतन्याची जळती ज्वाला
नव रुधिरानें ह्यातें न्हाऊं

## दुंदुभी हा धडधडे

सोडुनी द्या स्वार्थ आतां देशकार्या व्हा पुढें
दुंदुभी हा धडधडे

आठवा कृत्यें प्रतापी पूर्वजांचीं मागलीं
ख्यात जीं पृथ्वीतलीं
फोडुनी टाका विनाशी भीतिचे सारे चुडे
दुंदुभी हा धडधडे

दुष्ट शत्रूंनीं लुटूनी देश नेला हा पहा
जाहला कंगाल हा !
मातृभूला सोडवाया निश्चयानें व्हा खडे
दुंदुभी हा धडधडे

तीस कोटी शूरवच्चे सिंहसे वीराग्रणी
एक सत्याचे धनी
कोण येतो येऊं द्या त्या मृत्युच्या दाढांपुढें
दुंदुभी हा धडधडे

वाहतो वायू वसंती मंजु गाती पांखरें
हांसती मोदें घरें
गाजवा जय आर्यभूचा लाजवा शैली-कडे
दुंदुभी हा धडधडे

## वंद्य विभूति

निज सर्वस्वा जन्मभूमिच्या
पायीं जे अर्पण करिती
ते जगतीं ह्या वंद्य विभूती
म्हणुनी शाश्वत यश वरिती

दुःखित हृदयां सुखवायाला
पडलेल्यांना उठवायाला
दीन जनांला सांत्वन द्याया
पुढें सदोदित जे सरती

निज भू दास्यांतरिं फसलेली
कधीं न आनंदें हंसलेली
वाळुन गेलेली जणूं वेली
तिच्या कारणीं जे मरती

नाना दुःखें नाना विपदा
जगणें दारिद्र्यांत सर्वदा
मातृभूमीच्या साठीं शतदा
कारागृह हीं पत्करिती

## वंद्य विभूति

तुरुंगांतली थाली वाटी
कैद्याची ती हलती पाटी
काथ्याची निजण्याला ताटी
अलंकार ज्यांचे ठरती

सौख्यावरतें सोडुन पाणी
वस्त्रें लेवुनि जुनीं पुराणीं
थंडीवाऱ्यांतुनि अनवाणी
निज भूमिस्तव जे फिरती

परवशतेला कुचलायाचें
स्वातंत्र्यातें उचलायाचें
समतेला विस्तारायाचें
कर्तव्य न जे विस्मरती

दयाप्रेम हृदयांतरिं विलसे
उदार मानस पृथ्वीतलसें
आळस ज्यांच्यामधें न गवसे
मधु वाणीनें मन हरती

## वंद्य विभूति

परमेशाचे सद्‌गुण गाती
मनीं तयाचें स्वरूप ध्याती
सरळ शुद्ध मार्गानें जाती
सत्य सर्वदा आचरती

## हिन्द-वन्दन

हिंदभूमि नम्र माथा हा तुझ्या पायीं असे
कीर्तिगीतें गात तूझीं मी सदा नाचे हंसे
जन्म माझा येथ झाला
भाग्य हें आलें फळाला
श्यामला ती मूर्ति साधी मन्मनीं तूझी ठसे

## दिन ते निघूनि गेले

दिन ते निघूनि गेले आनंद मात्र नाहीं
संताप दुःख सारें चिंता जिवास खाई

गेलीं रणोद्धतांचीं कृत्यें पराक्रमी तीं
शाहीरबुल्बुलांची सुकली रसाळ रीति

ही हिंद फूलवेली फुलली जगांत होती
होते मिलिंद रुंजी घालीत तीसभोंतीं

धनधान्य–पूर्ण–गर्भा सौख्यांत नांदणारी
मरते आतां भुकेनें झाली अशी भिकारी

हंसती तिला बघूनी नादान पुत्र तीचे
करणार दूर केव्हां दुःखाश्रु ह्या सतीचे

## होऊं नको हताश

होऊं नको हताश
भारता होऊं नको हताश

घूस पुढें अन् पुढें
खंडले परवशतेचे पाश

गावांगावांतुनी उसळले
तरुण पहा युद्धास

आलिंगिति मृत्यूस कामिनी
जणुं अपुल्या प्रियकरास

हा बघ इकडे फांसावरतीं
जातो डोलायास

सत्याग्रही पतीला लावी
ही कुंकुम–तिलकास

धनेश हा इकडे शिलगावी
खजिने आणि विलास

बृहस्पतीचें विद्यामंदिर
सुटे, उफाळे श्वास

## होऊं नको हताश

शहीद बघ हे तुझे विकसले
जसे वसंत-पलाश

तुफान उठलें प्रचंड धांवे
पवन क्षोभ जलास

गुलामगिरिचें तारूं आतां
हाकूं देच झकास

हाण अंतिचा टोला आणिक
करून टाक खलास

## हाक

हृदयांमधिं हा रुतला कांटा
हाय गुलामी आली भालीं
तुजविण वाटे जीवन मरणें
स्वतंत्रते ये लवकर खालीं

झालिस मजवरि रुष्ट अशी कां
राग कशाचा तुजला आला
काय गुन्हा मी केला असला
पाठविली ही जहरी हाला

तुझियासाठीं हजार वर्षें
केली खटपट परि ती फसली
गुलामगिरिची कालभुजंगी
येऊन मम हृदयासच डसली

गुलाब गळले कांटे उरले
सुकली नव फुललेली वेली
बघतां बघतां तुजविण देवी
दग्ध जाहली सुरभि चमेली

दया करी हे स्वयंतंत्रते
नको लोटुनी जाऊं दूर

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. ८४९८

घेईं तुज जें हवें परंतू
नको करूं हीरक हा चूर

काय पाहिजे तुजला आणिक
घेउनि जा जें तुजला वाटे
तव पायांवर प्राण असे हा
लोटिं दूर वा लावि उरातें

दुःख कसें मी तुजला सांगूं
अंतर हें जळतें दिनरात
अंधकारमय जीवन झालें
करुणा करिं नव उजळिं प्रभात

विशाल वटवृक्षाहुनि जैशा
पारंब्या धरिणीवरि येती
तुझ्या कृपेच्या जीवनधारा
येउनि भिजवूं दे ही शेती

तुझ्या कृपेनें मृत ही उठती
शुष्क तरूला पानें फुटती
तूं येतां क्षणिं शांतिसमृद्धी
ज्ञानबलें येउनीया जुटती

## हाक

हवी तूंच मज तुजसि चाहतो
तुजविण सारा व्यर्थ पसारा
जादूची तव कांडी फिरतां
फुटतिल दगडांतुनि जलधारा

शरीर जीवावांचुन जैसें
स्वतंत्रते तुजविण हा देश
तूंची हवी मज अथवा मृत्यू
एक इथें उरलासे शेष

## आतां

हतबल सारे लोक अतांचे झाले हिंदुस्थानी
लोप पावलें वीर भटांचें रणांगणांतिल पाणी
मृत सुसरीपरि तोफा पडल्या किल्ल्यावर दिनवाणी
खड्या सुरानें अतां न कोणी थाप डफावर हाणी

अवसेचा काळोख पसरला चहूंकडे घनदाट
स्मशानशांती अप्रतिबंधें नांदे वाटोवाट
स्वैरपणें देशांत वाहती भयभीतीचे पाट
शून्य जाहले गजबजलेले आनंदाचे हाट

पुढें करीती आतां केवळ काव्यामध्यें ढाला
रंगभूमिवर दिसतो केव्हां फक्त टिनाचा भाला
वाव सांपडे विवाहोत्सवीं केवळ संग्रामाला
आणि औषधामधें येतसे बाण अतां कामाला

ताव मारिती श्रीखंडावर करिती शाब्दिक मारा
असतो आतां समाज केवळ तमासगिर जमणारा
तापमापकामध्यें चढतो खालींवरतीं पारा
दिसति पुरातन वस्तुसंग्रहामधें मात्र तरवारा

## आतां

बांधति आतां हवेंत किल्ले अंगावरतीं कोट
काचेच्या प्याल्याचा घेती आतां सर्बत घोट
लालभडक होतात आजला विडा खाउनी ओठ
तोफा नाहीं डागति केवळ अपुलें आतां पोट

पूर्वीचें लोपलें नव्हे तें नवीन झालें आज
नवीनतेंतच काव्य राहतें वदे कुणी कविराज

## वशिष्ठ

वशिष्ठ ब्रह्मर्षे तुज वारंवार करीं नमस्कार
शांतिब्रह्माचा प्रत्यक्ष जगतीं झालास अवतार
कल्माषपादानें तव प्रिय पुत्र सर्व केले ठार
तरी त्याच्या अहिताला आणिलें न मनीं एकवार

गुणी जनांचे सद्गुण वाखाणणें असे त्वदानंद
अहंकारविरहित शोभतोस तूंच प्रेमकंद
स्वीय सहृदयतेनें घातकही विश्वामित्र मंद
ब्रह्मऋषिपदाप्रति नेलास तूं उदार अमंद

हरिश्चंद्र रामचंद्र राजेन्द्रांकडून तूं केलें
जगाचें अतुलनीय चिरंतन अगण्य कल्याण
तुझें मर्त्य तें शरीर कधींचेंच लोपूनिया गेलें
तारितोस तरी तूं जगतीं मज सारखे अजाण

दयामय शांतिमय सत्यमय तव आत्म्याप्रति
पुनःपुन्हां करीतसें ब्रह्मऋषे ही विनीत नति

## चांदबिबी

सुरकाननीं अप्सरा — असती नाना
भवभुवनीं रूपवती — कितीतरी
विजापूरची राणी चांद — सुलताना
तिची कुणीहि न करी — बरोबरी
सदा साहस ध्रुव तिचें — घोर रणीं
घरीं शांतिदया जणूं — शोभमाना
आहा करुणा किती तिची — दीन जनीं
विजापूरची राणी चांद — सुलताना
जसा फुलांमध्यें चांफा — श्रेष्ठ माना
तरूंमाजी सहकार — शिरताज
तशी राणीमाजी राणी — चांद जाणा
कोण वर्णू शके गुण — कविराज
जिनें जननीसम स्नेहें — स्वभवनीं
मज विदेशीं पाळिलें — यत्नगणीं
मी द्वितीय इब्राहिम — स्मरूनि ती प्रीति
तिच्या चरणीं अर्पितों — ही स्मरणगीति

## जप्त आश्रम

येती जाती कोठचे लोक आतां
गाती येथें कोण ते श्लोक आतां
प्रातःकाळीं प्रार्थनेचा ध्वनीही
आतां ऐकायास येणार नाहीं

कोठें आतां भव्य गच्चीवरी तो
संगीताचा नाद चित्ता हरी तो
आणी कोठें पूत तो पाकधूम
जाई आकाशांत सौधामधून

नाहीं आतां दीसती धौतवास
वाळायाला टाकलेले उन्हांत
नेसूनीया जानुपर्यंत धोती
कोठें आतां लोक ते हिंडताती

कोठें होता चालला माग वेगें
कोठें होता चालला राग वेगें
कोठें चर्खा चालला चात कोठें
कोठें होते वाद ते मोठ मोठे

कोणी होते धर्मचर्चेत गुंग
कोणी झेंडा लावण्या दंग तुंग

## जप्त आश्रम

होते कोणी राजनीतींत व्यस्त
खाती कोणी ग्रामसेवेंत खस्त

कोणी मागें लागले वाङ्मयाच्या
कोणी शास्त्रें आणि उंचात्रयाच्या
स्वार्थत्यागी वीर ते येथ आतां
नाहीं नाहीं हाय येती पहातां

जेथें होती लाविली शाकभाजी
तेथें आतां वाढलें रान गाजी
गेलें गेलें सर्व सौंदर्य गेलें
औदासीन्यें स्थान तें व्याप्त केलें

होता पूर्वीं जो जनानंददायी
झाला आतां तोच भीतिप्रदायी
जेथें काळीं हीं भुतें राहताती
तेथें कैंची पोंहचे प्राणिजाति

जेथें पूर्वीं राहण्या मोद वाटे
घेते माता ज्यापरी गोद वाटे
तेथें आतां जावयालाहि बंदी
तेव्हां घेई ही दुरूनीच वंदी

## महात्मा गांधी

हा फाकडा फकीर । चालला नाहीं कांहिं फिकीर

पायीं साध्यासुध्या वाहणा
जाड कांबळें शीतवारणा
टक्कलवाला महा शाहणा
निःशस्त्राचा वीर

देहावरतीं मुळीं न मास
अडका नाहीं खर्चायास
विद्वत्तेचा जवळ न पास
परी असे खंबीर

ऐशा भिकारड्याच्या मागें
चाळिस कोटी जनता लागे
बादशहाही भिउनी वागे
नमती मत्त अमीर

स्वातंत्र्याचा पाइक निधडा
गरिबांचा कैवारी उघडा
सत्याचा मूर्तिमंत पुतळा
घेउन हातीं शीर

## महात्मा गांधी

सत्ताप्रमत्त बोजड धेंडें
आसामांतिल जैसे गेंडे
तोडुन टाकुन अपुले शेंडे
बनती ज्याचे कीर

शरद् ऋतूचा वाहे वारा
कुंचित झाली गंगाधारा
करित जगावर असह्य मारा
लखलखणारा हीर

शमला उन्मद सागर सारा
प्रशांत झाला तुफान वारा
हसूं लागल्या गगनीं तारा
नेसुन खादीचीर

## महात्मा गांधी

तूं अमुच्या हृदयांचा एक महाराज

दुःखें नित सारा हा व्याकुळला लोक
करिती थैमान जगतिं दानव बिनधोक
विरति नभीं दीनांचे करुण हाय शोक
तूंच निघालास कराया तया इलाज

स्वैर विलासांत सर्व विश्व दंग झालें
स्वार्थाच्या सागरांत जन पुरे बुडाले
भोगांचें भरलेंसे शिगोशीग आळें
संयमसंदीप तूंच पाजळिला आज

सत्याचा मार्ग तुझा शस्त्र अहिंसेचें
विलसे वर वैभव तव धर्म पताकेचें
शांतीचें तेज नभीं फाकलें विजेतें
सांवरिलें फुटतें तूं जगाचें जहाज

जगताची धूळ शिरीं तूंच घेतलीस
अडकविलया निज चरणीं शृंखला खवीस
तळमसी बघुन दीनदुःख रातदीस
दिससी मज तूंच एक करित देवकाज

## मराठी

भाषा मराठीच आम्ही वदूं
चाखूं तिचें नित्य तें वाङ्मधु
आहे अहा आमुची माय ती
गाऊं यशोगान तीचे प्रति

पीयूषिंची ती तिची माधुरी
ते दिव्य गांभीर्य अब्धीपरी
आनंद होतो बघूनी मना
त्या स्वर्गसंचारिणी कल्पना

तीच्या शिरीं ज्ञानदेवी हिरा
एका उरीं हार तो गोजिरा
पायीं तुका पैंजणी रुणझुणे
कांची ध्वने रामदासस्वनें

मेरूहुनी थोर तद्गौरव
मी चिंतितों ह्या गुणांतें जंव
माझी मराठीच मंदाकिनी
होतें तिला पूत मी गाउनी

कीर्ती तिची भूतलीं फाकवूं
तीचेपुढें स्वर्गही वाकवूं
देऊं समृद्धी तिच्या वाङ्मया
राबूं तिला भूति लाभावया

मराठी ग्रंथ
ना. ........ क्र. ......
ता. ............
ठाणे.

## खय्याम

फेनिल ताजा गुलाबमधुचा प्याला
जो मजला तूं दिलास हा प्यायाला
अहा कवे तो पिऊनि झालों मस्त
कमलरक्तिमा चढला बघ गालांला

मत्त बुल्बुला गाई एक रुबाई
पर्वत सरिता पादप हलवुन जाई
देई झोकुन एकच प्याला मधुचा
दाव जगाला अस्मानी नवलाई

जो गेला तो पुन्हां कदापि न परते
नांवहि त्याचें जगामधें ना उरतें
त्याची माती दुसऱ्याच्या ये कामीं
परी तुझी ही वाणी जिवंत ठरते

संसाराची असारता दावाया
तसेंच त्यांतिल सार आणखी घ्याया
भेटलास तूं एकच गुलाबशौकी
फुलबाग हे चोंहिकडे लावाया

चुंबक जैसें लोहा ओढुन नेई
तसें काव्य तव खेंचतसे मज हेंही

खय्याम

सुललित त्याची पदावली जी झुलते
आम्रमंजरी जणुं ती झोका घेई

मत्त कोकिलापरि हें तूझें गान
दिगंतरें मोहून करी सुनसान
भेदुन जाई सकल जनांच्या चित्ता
मोद उधळुनी देई रानोरान

जाळुन टाका पुराण आणि मुल्ला
भडकावुन द्या जुनापुराणा चुल्हा
धार्मिक म्हणजे नुसता घातक भोंदू
करुं द्या सारा वेळ तयाला कुल्ला

नवा मानवी धर्म चिरंतन एक
पटवा वरच्या कोषामध्यें चेक
खरें वाजवुन दावा अपुलें नाणें
ठोका अपुल्या नांवाचा मग मेख

अहा तुझीं हीं सुवर्णाक्षरें ठेलीं
अनंत कालाच्या फलकीं लिहिलेलीं
कोण अतां ती पुसून टाकूं शकतो
अमर तुझी ही झाली वाङ्मय केली

## परलोक-प्रस्थित

आकाशांतुन सरी, पडती झरझर पृथ्वीवरी

स्वदेशसेवेला अंतरलों
बहीणबंधू सोडुन सरलों
नैराश्याच्या सरीं उतरलों

कोलाहल अंतरीं, चमकती विद्या अंबुदांवरी

प्रेमाचे जे मोड उगवले
मोदाचे जे किरण फाकले
हृदयाशीं जें हृदय मिळालें

कुसकरुनी सत्वरीं, तयांना निर्दय जातों दुरी

कुठें चाललों चिंता ह्याची
जेथुन जातो त्या जगताची
देह सकळ हा जाळुन टाकी

बघुनी ती भयकरी, मृत्युची भीषण मूर्ती वरी

शेवटचा मी निरोप घेतों
हृदय दाबुनी म्हणतों येतों
परी सर्व वरवरचें हें तों

नयनांमधुनी सरी, अश्रुंच्या उसळुन येती तरी

## वैषम्य

गाढ झोपले लोक परंतू मी जागत आहें
निद्रा मुळीं नसे नयनीं
जनता अपुल्या घरीं विसावा घेत सुखें राहे
परी मी तळमळतों शयनीं

सुखदुःखांचा सर्वतप्याला लाभे इतरांला
दुःखच्च माझ्या वांट्यास
फुललेला नव गुलाब हातीं कोणाच्या आला
मी परि मालक कांट्यास

दिवसरात्र हे जना मिळाले मला विधात्यानें
लिहिले दोन्हीहि न भालीं
आनंदाची उषा आननीं दिली कुणा त्यानें
काळी रजनी मम गालीं

वेलीं वरतीं फुलें उमलती नभोंगणीं तारे
उसळे हसें बालवदनीं
सूर्य सागरीं शिरला विझले दीपकही सारे
उठलें तमिस्र मम सदनीं

## अरब

प्रेमें वाढविलें तुला तुजपुढें चारा अर्धा टाकिला
आनंदें बसुनी तुझ्यावर सुखें तांडा पुढें हाकिला
माझा पुत्रच तूं असें वदतसें सारी मदीना अहा
फाडावें तुज मी जलास्तव अतां उंटा जळो जीव हा

नेत्रा आजच काय भूल पडली गेला चुकूनी पथ
चोहोंबाजुस वाळवंट पसरे हें एक दिग्विस्तृत
पाण्यावांचुन जीव हा तडफडे कोठें नसे सावली
सूर्याच्या प्रखरातपें अनलसी वाळू जळे तापली

मारावें परि हाय मी तुजसि ना उंटा जिवाच्या भयें
नेला मी तव संगतीं समय तो ध्यानांत येऊं नये
हा हा निर्दय मी नृशंस नर मी मी पापकर्मा खुनी
केले जे उपकार तूं स्मरणही त्यांचें न माझ्या मनीं

निंदूनी अपणा असें अरब तो शोकांतरीं पोंचला
प्यारा आणि सुरा उरांत अपुल्या त्यानें तदा खोंचला

## आंधळ्याचें गाणें

एकच पैसा दे भगवान्

दिसे न कांहीं मज पुढतीं
धोंडे चौंहिकडे अडती
खांचा पदोपदीं पडती
एकच पैसा दे भगवान्

प्रवास करणें बहु दूर
नदीस आलासे पूर
जिवास काते हुरहूर
एकच पैसा दे भगवान्

मार्ग वाकडा वरखालीं
काठी भग्न तशी झाली
थकले पाय घर्म भालीं
एकच पैसा दे भगवान्

नसे कुणी सोबत साथ
मुळीं न पैसा हातांत
मागूं कुणा अतां भात
एकच पैसा दे भगवान्

## आंधळ्याचें गाणें

थकलों मागुन सर्वांस
धरली एक तुझी आस
तुझाच आतां मनिं ध्यास

एकच पैसा दे भगवान्

गांवोंगांवीं किति फिरलों
घरोघरीं मागत शिरलों
पथीं सदोदित भिरभिरलों

एकच पैसा दे भगवान्

सोडुन दिलें सर्व कांहीं
सारी इथें भुलभुलाई
म्हणुन निघालों तव पायीं

एकच पैसा दे भगवान्

परंतु आतां हें झालें
बसणें इथें भाग आलें
पुढचे मनोरथ निमाले

एकच पैसा दे भगवान्

## आंधळ्याचें गाणें

याचक तुझा इथें रडतो
ऊर सारखा धडधडतो
श्वास वरी उपरी चढतो

एकच पैसा दे भगवान्

इथें अतां तूं येशिल का
पैसा एकच देशिल का
घरीं आपुल्या नेशिल का

एकच पैसा दे भगवान्

## अंतिम

प्राण माझे व्याकुळले वाहती आसवें गालीं
कुसुमें गळालीं खालीं
निराशा झाकिते डोळे चिंता कोंदाटली भालीं
मेघतमें दाट झालीं

गेला उडूनी आनंद पोपट पिंजऱ्यांतूनि
भीषणता वाढे दुणी
मायेचा कोमळ शब्द नाहीं बोलायाला कुणी
तडफडे मीन उन्हीं

धरूं धीर कसा आतां जाऊं निराश्रित कुठें
नांगर होडीचा तुटे
झाल्या वाटा सर्व बंद श्वास मंद मंद उठे
सान्त अनंताशीं जुटे

## भिक्षेकरी

कुठें बसावें कुठें निजावें चिंता ही लागली
चालुनी देहलता भागली
जावें कोठें खावें कोठें डाकिण ही मागली
सुटे ना रक्तपिसी पागली

रात्रंदिन मनीं तळमळ चाले पोट भरावें कसें
सुखाची झोप घडीभर नसे
भिक्षेसाठीं भिरभिर फिरतों जनता सारी हंसे
देइ ना अन्न कुणी अल्पसें

हाकुन लाविति लोक मार्गींचीं कुत्रींही भुंकिती
घालुनी तेल वरी फुंकिती

'नाहीं कांहीं मिळावयाचें नीघ येथुनी कसा
माजला खाउनि रेडा जसा
धष्टपुष्ट अंगानें दिससी पहा जरा आरसा
फुगला तळलेला अनरसा

कष्ट कराया जिवावरीं ये खायाला पाहसी
आयते आळसांत राहसी

## भिक्षेकरी

भीक मागण्या लाज न वाटे रसनासुख चाहसी
नारकी जीवन अवगाहसी '

निर्विकार ऐकतों जनांची मर्मभेदि हीं वचें
हाय परि जीवाशा नच खचे

मजुरीकरितां मरमर फिरलों मिळती जर ती मला
मिळावा मीन ज्यापरी जला
कशास मग प्यायाला आलों असतों हालाहला
बोध हा जनतावदनांतला

शरीर सुकुनी क्षीण जाहलें म्हणती तरी माजला
धिक् असो अशा ह्या मला

## भिकारीण

दिवा लावाया तेल घरीं नाहीं
आणि नाहीं हें असें चांगलें ही
दैन्य अपुलें पाहणें उजेडांत
हृदय माझें हें तोडुनीच खात

रात्र राहिल जर अशी सदाचीच
झोप येइल जर सौख्यदा अशीच
हाय तुकडे मागीत फिरायाचें
टळुन जाईल दुर्दैव एकदांचें

नेसण्याला वस्त्रही पुरें नाहीं
असें जें हें फाटकें जुनें तेंही
झोपण्याला ही धुळीची जमींन
थंड वाऱ्याचें वरी पांघरूण

चंद्रमौळी झोपडी रहाण्यास
जिथें नाहीं प्रतिबंध तो कुणास
चहूं बाजूंनी शिरे आंत वारा
पावसाच्या उतरती वरुन धारा

मला कोणी ही देत नसे त्रास
परी लोकांना त्रास द्यावयास

## भिकारीण

जगीं आलें मी अभागी करंटी
भीक मागित हिंडतें दिवारातीं

दिला मजला जन्म कां ईश्वरानें
वाढवीलें कां एवढें तयानें
मारुनी कां मज टाकिलें न आधीं
जगायाचा हा लावियला व्याधि

इच्छिती जे जगण्यास त्यास मारी
आणि मजसम जीवास मृत्यु तारी
दोष देऊं मी कुणाला उगाच
दुष्ट दैवाचा खेळ हा असाच

## अभागी

चला खेळाया म्हणसि मला बाळा
आणि ओढसि निज करें धोतराला
तुझे साधे हे बोल चिरुन जाती
हृदय माझें नच तुला कल्पना ती

कुठें आतां खेळास वेळ आम्हां
कुठें आतां उत्साहमेळ आम्हां
कुठें स्फूर्ती आम्हांत असे आतां
त्राण कोठें देहांत आणि आतां

सकाळीं जें कामास घरुन जावें
दिवसभर मरमरुन तें करावें
थकुन भागुन निर्जीव परत यावें
शून्य भावें घरिं आणखी पडावें

असें अमुचें हें जिणें इथें बाळा
त्यांत वाव न दुःखास वा सुखाला
नसे हंसणें रडणें हि नसे त्यांत
मोद नाहीं शोकही ना तयांत

दिवस गेले आमुचे खेळण्याचे
दिवस गेले आमुचे हांसण्याचे

## अभागी

दिवस गेले आमुचे रडायाचे
दिवस गेले आमुचे पडायाचे

खेळ आम्हाला कुठुनि लाभणार
जीव गेलेला कुठुनि भेटणार
पिंजऱ्यांतुन पक्षि तो उडुन गेला
शून्य आतां पिंजरा राहियेला

जाइं उडत्या फुलपांखरा फुलांत
खेळ आनंदें स्वैर गीत गात
नको बोलावूं मला अभाग्यास
तुझ्या खेळाचा विरस करायास

खेळ झाला मम सर्व जीवनाचा
नसे जीवाला आसरा कुणाचा
तुम्हा स्वर्गांतिल बालकां बघून
दिवस जाती हे कसेतरि निघून

## मुसळधार जळ पडते

मुसळधार जळ पडते
वीज भयद कडकडते
गृहविहीन मी विजनीं
घोर तमोमय रजनी
फूत्कारिती वन्य फणी
अंतर मम धडधडते
मार्ग मुळीं नच गवसे
नेत्र अंध होति जसे
धैर्य मनीं आणुं कसें
शिथिल तनू डळमळते
करिल अतां साह्य कोण
सोबत हे पाय दोन
गेले तेही गळोन
काय पुढति तरि घडतें
तारुं हें सुकाणुंवीण
शिडें फाटकीं नि जीर्ण
दर्या उसळे तुफान
तरतें कीं तळिं बुडतें

# कृतज्ञता

आकाशिं मेघ दाटले
मधु पयोकुंभ सांठले
  ह्या तृष्णाकुल भूवनीं
ओतिती अखंडित जळें

उगवले तृणांकुर नवे
श्यामता मधुर घवघवे
  हीं सृष्टीचीं झांकलीं
प्रगटलीं दिव्य वैभवें

टवटवीं विकसली द्रुमीं
प्रस्फुटलें स्मित सुमसुमीं
  घनघोर वाहती नद्या
उत्तुंग थडा लंघुनी

वनमाली आलास तूं
उपटुनी हळूं खास तूं
  निज उद्यानीं लाविलें
हें रोप एक फालतू

तरु सोडुनि माकंदसे
निवडिलें त्रिगुण मी असें
  ह्या तुझ्या अमर प्रेमाचें
उत्तराई होऊं कसें

## जिवंत बुजगावणें

मजुरा,

आहेस तूं एक बुज्‌गावणें
शेतांत जें दीसतें हें उभें
ह्याचें तुझें एकरंगी जिणें
दे सोडुनी वैभवी मन्‌सुबे

ह्याला न दाणा न पाणी मिळे
अंगीं जुनें फाटकें आंगडें
कांहीं न दोघांमधें वेगळें
रात्रंदिनीं राबतों कीं खडे

जे येथ थोडेहि ना राबती
ते मारिती मौज गिर्यावरी
घर्मेंच धान्यास उत्पादिती
खाया न त्या कोरडी भाकरी

हा बाग मीं लाविला पोशिला
माझें असें यांत कांहीं नसे
आले अहा घोस डाळिंबिला
खाया मला एक कांदा असे

## जिवंत बुजगावणें

बुजूगावण्या पांखरें हांकण्या
केलें उभें तूज शेतावरी
तैसें मला ठेविलें राखण्या
ही बाग हें शेत ही बाजरी

आहों खरे सर्वथा सारखे
झालों सुखाला जगीं पारखे
निर्जीव तूं भेद हा मी म्हणें
जीवंत मी किंतु बुजूगावणें

## किसान

जो जगाचा अन्नदाता त्यास आतां भूक खाई
कोठचा आनंद त्याला लागली दुःखें सवाई
घालुनी पाणी जिवाचें काढिला कापूस ज्यानें
झांकण्याला लाज त्याला वस्त्रही नाहीं पुराणें

लोककल्याणास ज्याचा वाहिला हा जीव आहे
विश्वकासारामध्यें जो एकटा राजीव आहे
पोषणाला जो जगाच्या कष्टणारी पूज्य माता
हाय त्याच्या दुर्गतीला पाहती कोणी न आतां

तापतो डोईवरी चंडांशु मध्यान्हीं कराल
घालवीती साऊलीखालीं पशू पक्षीहि काल
तापली भूमी नि वायू जीव घेई कीं तहान
नांगरी तेव्हां बिचारा शेत दुर्भागी किसान

हाय दुर्दैवी किसाना घाम गाळीं जीव जाळीं
शेवटीं मेवा पराचा कष्टणें तूझ्या कपाळीं
ही जगाची रीत आतां घे तरी ध्यानीं जराशी
दाखवीं कांहीं करूनी जुंप किंवा नांगराशी

## अस्पृश्य

शुद्धि ज्यापासून लाभे आज तो अस्पृश्य झाला
स्वच्छता विश्वीं करी जो बोलती अस्वच्छ त्याला

भोगितो तो आर्यदेशीं
नारकी ह्या यातनेशी

पापनाशी जाह्नवीची योग्यता द्यावी जयाला

दुःख जो सोसून सारें सेवितो हिन्दुजनांला
मानितो उद्धार त्यानें लावितो धूळी कपाला

त्याजला बक्षीस त्याचें
लाभलें हें मात्र साचें

सोडुनी मानव्यतेला श्वानतेला तो मिळाला

## गिरणी कामगार

सखे गे, हालाहल दे मला
हा वास पुरे येथला
जगिं गुलाब बहु उमलती
झुलतसे मधुव्रत-तति
इतरांस फुलें लाभती
मज कंटकचय बोचला
लोंबती तरुवरी फळें
ज्यांतुनी मधुर रस गळे
मज मिळती परि टरफलें
उडविती इतर मधुजला
ये दसरा दीपावली
किती पक्वान्नें बहरलीं
आमोदकळी विकसली
मजकडे परी निर्जला
धनधूर निघे निशिदिनीं
गिरणींच्या पोंग्यांतुनी
धनि सेविति हेमांगिनी
मी धूरच परि चाखला
हें असेंच मजला जिणें
जर असेल अवलंबिणें
मग हालाहल विष पिणें
कां मार्ग नसे चांगला

## शेठ

मोटारींतुनी जाणाऱ्या ऐटबाज शेठा
कां उगाच दाखवितोसी दोंददार पोटा

गरिबांच्या निश्वासानें चाक तुझें भरलें
नयनांतिल तेजें त्यांच्या दीप पेटलेले
आणि तुझ्या पोंग्यामध्यें तदिय कंठ चुरले
माहित मज आहे सारा तव दिमाख खोटा

रुधिरानें त्यांच्या तूझे गाल लाल झाले
खाउनि पोटांस तयांच्या दोंद पुढें आलें
आणि तयांच्या कष्टानें सौख्य हें मिळालें
ठेव तूंच अपुल्याजवळीं नर्कनिंद्य नोटा

बेगुमान हाकित जाशी रस्त्यांतुन गाडी
चोंहिकडे मिरविशि तनु ही भरमसाट जाडी
धरिशि आणि अधिकाऱ्यांची नम्रपणें दाढी
परि गरिबांच्या डोक्यावर पिटसि अदय सोटा

गरिबांना लुटुनी केलें फार तुवां दान
गगनगामि देउळ भव्य बांधियलें छान
कमाविली अक्षय कीर्ति उडविलें विमान
नमस्कार माझा तुजला तूंच एक मोठा !

## काय सखि गाउं तरी मी आज

काय सखि गाउं तरी मी आज

भवतीं वणवा पहा भडकला
आकाशाला गिळतां ज्वाला
जीवांचा संहार चालला
करी न कोणी इलाज

तुझ्या मुखाची सुधामाधुरी
कंठांतिल गोड रागदारी
चमक दृष्टिंतिल आणिक न्यारी
रोजचेंच हें काज

गिरण्यामध्यें लाखो प्राण
दळले जाती नित बेभान
कृषक हिंडती रानोरान
खाया नाहिं अनाज

धनिक उडविती मोतीचूर
निघे तिथें सोन्याचा धूर
गरीबांस नाहीं पटकूर
किती नासला समाज

पसरे पुढतीं अथांग सिंधु
क्षुब्ध जाहला बिंदुन् बिंदु
आणि हाकितों आम्ही हिंदू
सुकाणुवीण जहाज

## मजुर सुटति गिरणिंतुनी

मजुर सुटति गिरणिंतुनी
स्वैर उठत हास्य वदनिं

क्षीण नयन खोल जात
दीपच कीं कंदरांत
खिदळत बेसूर गात
रमत जाति पथांतुनी

बसत कळाहीन गाल
दुःखें डवरला भाल
दैन्यामधिंही खुशाल
करिति मौज मुक्तमनीं

मलिन तदिय चिरगुटांत
आत्माही मलिन वसत
जणुं चरकांतून निघत
ऊस हाय ते पिळुनी

## शेतकरी

आनंद जो चहुंकडे दिसतो जगांत
जो मंदमंद विहरे सुमगंधि वात
आलोक शोकहर जो मिळतो जनांस
आधार एक खलु शेतकरी तयास

त्याच्यामुळें अखिल विश्व सजीव झालें
मांगल्य ह्या तरुलतांप्रति आजि आलें
झाली अहा धरणिही धनधान्यशाली
सौभाग्यकुंकुम जिच्या विलसे कपाळीं

माकंद जो विकसला नव संस्कृतीचा
गंगौघ वाहत अखंड शुची कृतींचा
ज्याचें खुले सहजरम्य ऋजुत्व येथें
अम्लान पंकज जसें सरिं शोभतें तें

मी वंदितों अजि अशा कृषकास भावें
त्यातें चिरंतन सुखी जगातें करावें

## शेत खणत शेतकरी

शेत खणत शेतकरी
तापत रवि तीव्र वरी
अंगांतुन घाम गळत
श्वास सारखा चालत
कुदळ तरीही मारत
कष्ट असे सतत करी
थकला तरि नच बसणें
दुखत अंग तरि खपणें
मरणिं कसेंतरि जगणें
सुख न हाय तिळभरी
आणि धान्य जें झालें
त्यास न तेंहि मिळालें
हेंच शेवटीं कळलें
पोट न त्याच्या शरिरीं
निजती जे महालांत
मोटारींतून फिरत
मरणें त्यांकरितां नित
हीच तुझी कामगिरी
तुजकरितां नच खाणें
तुजकरितां नच गाणें
आणि नसे तुज रडणें
फक्त मार तूं कुदळी

## जीर्ण समाधि

समाधिस्था साधो विपिनवसते कोण असती
समाधी माझारी वनभव तृणें तीं उगवती
शमायातें कंडू कलुषित शिरें घासति म्हशी
तसे नाना पक्षी बसुनि करिती घाण भंवतीं

तुझी वाणी पूर्वी मधुर उपदेशामृतवती
इथें ऐकायाला असतिल किती लोक जमले
पदीं झाली तूझ्या अवनत तदा मस्तकतति
परी आतां श्वानें तुज भिजविती आंतिल जलें

नको दु:खी होऊं कुणि कवि तुझें जीर्ण थडगें
स्वकाव्यानें विश्वीं अमर करुनी सोडिल सदा
कुणी ओतूनीया जवळिल धनी द्रव्य अवघें
नभोद्भेदी आणी उभविल तुझ्या स्मारकपदा

अहा तेव्हां हर्षे स्तवन तव गातील तरुणी
सडा आनंदाचा घमघमन टाकील वरुनी

## सुख

सुखा तूं क्षितिज सत्य—दूर दूर सारखें पळतें
किंवा मृगतृष्णिकाच—हातीं कदापि जी न लागे
हरिश्चंद्राचा रांजण—किती टाका परी पाणी मागे
वा मारुतीचें शेपूट—किती लांब आहे ना कळतें

तुझ्या पाठीमागें सारें जग अनादि कालापासून
लागलें आहे परंतु कोणालाहि तूं न मिळालास
दरवळला जगांत आहे तव सुरभि सुवास
परी न पाहिलें कोणी फुल्ल तव वदनप्रसुन

व्याधाचें तूं संगीत—गारुड्याची पुंगी मनोहर
आम्हीं आहोंत हरीण—डोलतसों छान भुजंगम
किंवा तूं दीपक—आम्हीं तुझ्यावरी घालतों झडप
काय किंमत जिवाची जर न लागती त्वन्मोहर

काय राहते जीवन त्वदाशेचा नसता संगम
तुजवरी न शेकतां वाजला कां सांगना हा डफ

## आजार

अजि सेवा करण्या तयार सारे आप्त
इच्छिलीं सुखें मज सर्व जाहलीं प्राप्त
परि भाव मनांतिल अतां कुणाला सांगूं
यातना मला ह्या नाहिंत कां पर्याप्त

झोपाया सुंदर कोमल मऊ बिछाना
खायाला ताजीं फळें रुचिप्रद नाना
घालित वारा भगिनी उभ्या सभोंतीं
परि झोप न येई क्षणभर ह्या डोळ्यांना

जे शत्रू होते मित्र आज ते झाले
जे होते दूरी समीप तेही आले
प्रेमाचा पसरे मंगल मधु आलोक
परि काळोखांतच माझें हृदय बुडालें

आजारा आहे राजशाहि तव थाट
किति वर्णूं आणिक तुझा प्रताप विराट
जाहलें आजला सारें मज अनुकूल
अन् हाय चालली चितेकडे ही खाट

## बालिकेस

आलीस तूं मज समीप सुरम्य बाले
डोकीवरी मसृण केशकलाप हाले
गालांवरी मधुर फाकत मुग्ध लाली
वाटे जणूं हंसत काय उषा निघाली

एका क्षणांत मज मोहुन टाकिलेंस
हास्याचिया क्षणिक सोडुनिया कलेस
माझें उदासपण तूं मधु दृष्टिपातें
येतांच आंत झणिं घालविलें सुजाते

ऐकूनि गोड तव ते लडिवाळ बोल
झालें अहा हृदय मोदभरें विलोल
जेव्हां मला बिलगलीस हळूं हंसून
मी चुंबिलें तव अमूप मुख प्रसून

छाया पडो न तुझियावर दुर्भगाची
राहो सुहास कमनीय मुखीं असाचि
सौंदर्य पावन तुझें विकसो अमंद
आनंदसिंचन करोत अबोध छंद

# सुटी

विहंग वृक्षावरुनी उडाले
स्वर्णद्युती मत्स्य तळीं बुडाले
गेले प्रफुल्लानन बाल गेहीं
चैतन्य सौंदर्य मनुष्यदेहीं

ऐकूं न येई कलनाद त्यांचा
मृणालमृद्वीक मरालकांचा
अबोध आमुग्ध विनोद गेला
कीं शर्करेचा मधुगंधि ढेला

विमोहिनीं तीं वदनें अमंद
अत्फुल्ल अंभोजक-सांद्रवृंद
ईषत् कपोलवरां मुग्ध लाली
हा स्वर्गिंची सृष्टिच ती निमाली

अदम्य जिज्ञासुक वृत्ति गेली
सौंदर्यशोधी नव दृष्टि गेली
रसाल चित्तंगम गोड वाणी
गेलींच ती वंजुलमंजु गाणीं

## सुटी

विशुद्ध ते कुड्मलकुंददंत
न नेत्र हे तोषवितात हंत
उफाळणारें हंसणें न कानीं
येई अतां धुर्स्वनिवीचिवाणी

ज्ञानोदयाचा उदयाद्रि भाल
ते त्यावरी कुंतललोलजाल
विस्फारलीं तीं नयनें सुशील
पृथ्वीवरी स्वर्गहि आणितील

स्मशानसें हें स्थळ शून्य वाटे
गेलीं फुलें कंटककुंज दाटे
आनंद उत्साह अतां निमाला
उजाड वाटे फुलबाग झाला

## नाविक

अथांग सागर उसळे गगनोत्संगीं
मृत्यूची कीं भीषण भृकुटी भंगी
वल्हविशी ही कशास अपुली होडी
ह्यांत तारवें नष्ट जाहलीं जंगी

वरी पसरलें अनंत हें आकाश
अफाट दर्या खालीं करितों वास
तुझी मोडकी होडी सांगे आतां
होइल कैसी ह्या दोघांतुन पास

पिसाट वारा घो घो उलटा धांवे
ज्यानें भारी पर्वत उडुनी जावे
तुझी बिचारी होडी डळमळणारी
टिकेल कैसी ह्यांत नसे कां ठावें

चोहिंकडे कोंदला निबिड अंधार
दिसे न नेत्रा पुढें पाउलें चार
प्रचंड कोलाहल लाटांचा श्रवणीं
अपुल्या हातीं कशास होशी ठार

## नाविक

जरा नजर ह्या दर्याच्या तळिं टाकीं
सम्राटांचीं हाडें दिसतिल बाकी
मुत्सद्दी कवि शिल्पी वक्ते योद्धे
झाली कैसी ह्यांची पहा हलाखी

अथांग सागर उसळे नाविक चाले
विशाल लाटांवरतीं होडी हाले
अखंड वल्हीं पाणी कापित जाती
त्यांत रंगला सारें भान निमालें

फुटत्या कल्लोळांच्या तुषारमाला
शीतल करिती त्याच्या भव्य कपाला
कुंतल त्याचे प्रभंजनानें उडती
आणि शोभवी विशालता वक्षाला

भीती नाहीं नाहीं शंका कसली
अथांग दर्यामध्यें होडी घसली
वचन ऐकुनी धृती तयाची हसली
सिंधु उफाळे गगनें नी खसखसलीं

## प्रश्न

बागेमध्यें लहान बाला
आली मोदें फिरावयाला
खुडूं लागलीं गुंगत गाणीं
पुष्पें अपुल्या मृदुल करांनीं

हा हा हू हू ओहो छान
हंसतें यांचें पानन् पान

बघून आनंदी ती बाला
झाला माझ्या मोद मनाला
तिला म्हणालों कोणासाठीं
खुडशी पुष्पें वाटोवाटीं

ओहो हूहू हीही आहा
देवासाठीं खुडतें पाहा

मंजुल नूतन निगूढ गाणीं
म्हणशी कोणाला हीं आणि
करीत अपुले डोळे वरतीं
फिरूं लागली मग भरभर ती

आहा हाहा आणा ध्यानीं
देवाला हीं गातें गाणीं

## प्रश्न

सारें मजला कळून आलें
एक प्रश्न परि आहे बाले
मनोमोहिनी तव ही काया
भूषविशी वद कुणास द्याया

आहा ओहो ऊंहूं आहीं
मला मुळीं हें माहित नाहीं

गाणीं गुंगत निघून गेली
नाचत हांसत ती फुलवेली
तोडित एका मधु कलिकेला
तोच प्रश्न मी मजला केला

ऊंहूं हीही ओहो आही
मला मुळीं हें माहित नाहीं

## गायकास

गाइं गोड गान सख्या गोड गान गा
विश्वमोहिनी सुरेख एक तान गा

जादु तुझ्या वाणिमधें दिव्य भारली
माधुरिची मोदमयी मेख मारली
चांदणी चुरून चकोरास चारली
हालवींत अंतराल आवितान गा

मंद मंद थंड गंधवाह वाहतो
बाल सूर्य पूर्वशैल भाल पाहतो
पक्षिवृंद कुंजकुंज किल्किलाटतो
मंतरीत अंतरास गा उधान गा

दिव्य रागिणींत झोपल्यांस जागवीं
जागल्यास शीणहारि झोंप मागवीं
गांजल्यांस हर्षवीं तहान भागवीं
आत्मतेज पाजळीत रान रान गा

चोंहिकडे एक दुःखखेद माजले
मानवी अबोध जीव त्यांत भाजले
मृत्युचे कराल कालटांच वाजले
हीच वेळ गायका प्रमोदमान गा

## गायकास

तूंच तमिस्रांत एक दीप पेटला
सागरांत तूंच एक पोत भेटला
वाहता झरा मरुस्थलांत लोटला
        ओत ह्या हताश जीवितांत जान गा

घोळ पायसांत शर्कराल माधुरी
खोच अंतरांत एकदां तुझी सुरी
फाटुं दे कठोर ही धरा अतां उरीं
        गान तुझें दिग्दिगंत कंपमान गा

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क. ६४१८
संदर्भ शाखा (स्थल

## कुठें ठेवुं मी तुला

कुठें ठेवुं मी तुला
माझ्या हृत्कुंडितल्या फुला

दन्त तुझे ते कुन्दकळ्यांसम
नयन दाविती नीलकमलभ्रम
गुलाब फुलले गाल मनोरम
मुखीं इन्दु उगवला

तनू केळिच्या गाभ्यावाणी
बोल जणूं पाटाचें पाणी
हास्य वाटतें साजुक लोणी
बाग कीं हा बहरला

करूं किती ह्याचे तरि लाड
जपतें जणुं आंब्याचें झाड
होतां थोडाहि दृष्टिआड
जीव करी गलबला

## विहरतें नभीं पांखरूं

विहरतें नभीं पांखरूं
मी तयास कैसें धरूं

गोड मनोहर गाणें गातें
वाऱ्यावरतीं झोके घेतें
चोंहिकडे स्वच्छंद खेळतें
क्षण नजर न देई ठरूं

ह्याच्याकरितां छान पिंजरा
सोन्याचा मी पहा आणिला
रत्नजडित ही दांडी त्याला
आणखी काय तरि करूं

निवडक डाळिंबाचे दाणे
राजशाहि हें त्याचें खाणें
मऊ मखमलीवरी झोपणें
मन त्याचें शकति न हरूं

इतके दिन किति सुखें राहिलें
आनंदानें दाणे खाल्ले
उघडें मिळतां दार पळालें
हें द्वाड किती पांखरूं

## कांहींतरी

आलों कोठुन तरी
आणखी जातों कोठेंतरी

प्रकाश कोठें तमिस्र कोठें
कोठें पडले धोंडे मोठे
खरे तापती हंसती खोटे
चाकरी न भाकरी

काल कशाला उद्यां कशाला
शाल घरीं बाहेर दुशाला
पीयुषप्याला किंवा हाला
काय आंत वा वरी

सतार सारंगी वा वीणा
झाल्या सर्व इथें अवलीना
कोठें मक्का कुठें मदीना
आहे कांहीं तरी

## झोप

आशा नसे वा निराशा नसे
किंवा उदासीन भाषा नसे
मी बोलतों तें खरें बोलतों
सूर्यास्त विश्वीं सुखाचा असे

सौंदर्य मूर्तीमधें नासतें
पूर्ती अमूर्तामधें भासते
कांहींहि जेथें दिसेना मुळीं
सौंदर्य तेथें खुळें हांसतें

जीवास येथें असे लोपणें
आत्मा अमूर्तावरी सोपणें
गाणें दिनीं यामिनीची ऋचा
रात्रीं तमोजीवनीं झोपणें

## नवबाला

मूर्तिमंत सौंदर्याची चाल्
वनमाल्
विलासाची अभिनवा शाला
विश्वांतरें घूर्णयंती उच्छृंखला हाला
अयि नवबाला

नंदनींचें उमललें फूल्
सुदुकूल्
अयि हे पीयूषतरंगिणी
चिरंतन यौवनाची अभंग संगिनी
प्रेम-प्रस्नविणी

प्रगटली महा कविवाक्
मधुपाक्
अप्सरांची वीणा ध्वनयंती
सुकुमार सुरांगना प्रसूनचयंती
वीरविजयंती

नवबाला

जाईं किंवा राहीं परि थांव्
जरा थांव्
दिव्यतेची निस्यंदिनी झरी
आनंदतुषार विसिंचिनी हे सुंदरी
अनंत-संचरी

नीरव-निहित तव बोल्
अविलोल्
पसरला दिव्य गंध तव
विश्वगोल झुलवितो तुझा मधुरव
दारुण विप्लव

अयि हे कुमरि करीं हास्
चिरमास्
चंचल चिक्कण कुंतलिनी
मानसांत डोलणारी सुनील नलिनी
विश्व-विलोभिनी

## प्रतीक्षा

रानीं वनीं हिंडलें मी परी
नाहीं तुझी भेट झाली तरी
गेल्या निघूनी किती यामिनी
वार्ताहि तूझी न सांगे कुणी

माझ्यावरी कां असा कोपशी
छातीवरी दुःख आरोपिशी
राया तुझें कोवळें तें मन
झालें कसें आजला दारुण

केला तुझा कोणता मी गुन्हा
ज्यासाठिं हा लाविलासी घुणा
गेलास गेहामधूनी प्रिया
येणार नाहींस ना तूं पुन्हां

पूर्वीं कितीदां तरी भांडलों
सद्वाक्य-सीमाहि ओलांडलों
नाहीं परी प्रेम झालें कमी
फोफावलें रोप कीं आश्रमीं

## प्रतीक्षा

झालें परी काय आतां तुला
या तोडिलें हांसणाऱ्या फुला
गेली कुठें स्नेहस्यंदी वचें
हा अंतरात्माच माझा खचे

केले गुन्हे फार मी प्रेमळा
माफी करावी तयांची मला
माझ्यावरी प्रेम आहे तुझें
मिथ्या नको तें करूं आजला

## झुरणी

करुं किती तुझी मी मनधरणी
वाहिला जीवही तव चरणीं
लक्ष कशांतचि हें लागेना
सुस्वर सारंगी वाजेना
प्यास कशानें ही भागेना
खेदाचें वादळ सदा मनीं

तुजविण मजसी रुचत न कांहीं
मोद न देई रुचिर उशाहीं
दिशा शून्य नी भयाण दाही
क्षणभरी न येई निज शयनीं

दिवस तापतो निश्वासांनीं
ओलिचिंब होई नित रजनी
अविरत माझ्या दुःखाश्रूंनीं
दिनमणीस झुरते जणुं नलिनी

किती अतां मम अंत पाहसी
शरण असे सर्वस्वी तुजसी
यावयास कां उशीर करिशी
लागली एक तव रे झुरणी

## बागवानी

इकडेही सोड पाणी
अयी बागवानी
तापला हा बघ उन्हाळा
चालल्या अंगार ज्वाळा
मरतें मी मरुस्थानीं

सुकलीं मम सारीं पानें
जिरलीं मनिं आशा गानें
आजि झाली धूळधाणी

सिंचनें तव इतर झाडें
उल्लसित गाती पवाडे
परी मीच दीनवाणी

मजवरि करिं करुणा आतां
तुजवांचुन कुणि नच त्राता
सदयांची तूंच राणी

## अजि वाटतें उदास

कां कळेना कुणास
अजि वाटतें उदास

गोप वाजवी रानीं मुरली
भ्रमर घालिती रुंजी अपुली
उडते गगनीं विहंगमावलि
फुलतीं फुलें कशास

चाटति निज वत्सांना गाई
उरीं लाविते मुलांस आई
झरा नदीप्रत धांवत जाई
उगाच घेती त्रास

तारांकित वरि नभोवितान
खालीं सृष्टीचें मैदान
मध्यें वाहतो मधु पवमान
हा सर्वच कां भास

जीवन मरणाचें संगीत
अस्तोदय प्रतिदिन रंगीत
जीव पाहतो चहुंबाजूस
हांस असे कीं फास

## आजि वाटतें उदास

उडत कोठला पक्षी येतो
स्वैर आपुलीं गाणीं गातो
आणि शेवटीं उडुनी जातो
लावुनी ओढ जिवास

वाटे मृत्यू कवटाळावा
फोडून टाकावा हा पावा
अंताचाही अंत करावा
मिळायचें शून्यास

कुणासाठिं तरि जीव तळमळे
निशिदिनिं अंतर त्यावीण जळे
परी कोण तो न मिळे न कळे
होणें अंतिं निराश

कुणी तरी बोलावी आंतुन
हांक येइ कांहीं बाहेरुन
विहग बघे जायला उडुन
कुणि शमविल कां प्यास

## नभांत कादंबिनी

नभांत कादंबिनी
निराशा तशीच माझ्या मनीं

पिकें वाढलीं थोडीं वरतीं
गुरें कोवळ्या कुरणीं चरती
कृषक वावरीं ढवेरे धरती
बघतों खिडकींतुनी

दूर पसरली डोंगर-रांग
क्षितिजावर अंधुक नीलांग
शब्द वायुवरुनी डिंग्डांग
येति तरल कोठुनी

फर्लांगावर झुलतो निंब
जवळ नळ गळे ओलाचिंब
आरशांत माझें प्रतिबिंब
जाई कोमेजुनी

चार भिंतिच्या ह्या खोलींत
इथें राहतें माझें भूत
गात जिवाचें स्मशान गीत
भयाण दिन यामिनी

## नभांत कादंबिनी

माझा अंधारांत विहार
घुबड एकलें मजला प्यार
वाटे व्हावें लवकर ठार
नसे कुणाचें कुणी

जगताचा मी करितों द्वेष
रुचत नसे मज ढोंगी वेष
ईश्वर आहे मूर्ख विशेष
करी उगिच मेदिनी

## व्यथा

व्यथा ही माझी सांगू कुणा
भोगितों असह्य मनिं यातना

सुख थोडेंहि न माझ्या भाळीं
दुःख सारखें जीवित जाळी
काळी सदा अवस आभाळीं
प्रकाश नाहीं येणें आतां पुन्हां

प्रेम कुणाचें मज न लाभलें
अंकुर आशेचेहि करपले
भयाण सारें जीवन झालें
पुरा हाय गाडिचा मोडला कणा

फुलें गळाली सुकली वेली
दग्ध जाहली सुरभि चमेली
बागेची धुळधाण उडाली
क्रूर असावा देव असा येथ ना

## गति कोणती मम जीवना

गति कोणती मम जीवना
मनिं ये मुळीं नच कल्पना

जग धांवते अपुल्यापरी
रविचंद्रही फिरती वरी
नी जात मीहि कुठें तरी
बांधुनी दृढ लोचना

उघडूनिही नयनांप्रति
ना दिसे पथ पद्धति
साथहि न कुणि सोबती
करिल जो मम सांत्वना

जीवनास अधोगति
ठाउकें हें मजप्रति
कोठची मग उन्नति
मृत्युचीच उपासना

## कोठला तरी ध्वनि

जाऊं नको इकडूनि उठला कोठूनि तरी ध्वनि
बघूनि ती भीति त्याची हंसलों मी उपहासें मनीं

घुसलों तिथेंच अरण्यांत
तुडवीत फुलें नवजात

निडर बेपर्वा धुंद चाललों न जुमानितां वनीं
जाऊं नको पुढें पुन्हां उठला कोठूनि तरी ध्वनि

तिरस्कारें धिक्कारूनि वचन तें महा अभिमानें
हाय आतां रात्रंदिन हिंडितों निबिड वनरानें

नाहीं अंत नाहीं कोठें वाट
पसरले काटे घनदाट

फिरती हिंसक पशु मरणाची भीति क्षणोक्षणीं
सांगेल का मार्ग मज आतां तो कोठला तरी ध्वनि

## सत्कार

गांव कोठेंही दिसेना झाला पथीं अंधकार
चालूनि थकूनि गेलों ग्लानि येई वारंवार

नाहीं सोबत ना साथ
वादळी वाहात वात

भीतीनें फुटते छाती चोंहीकडे किर्र रान
धीर ना धरवे आतां कासावीस झाला प्राण

आशा कोणाची नसतां आलास काळोखांतून
धरिलास हात माझा हिवांत पाडिलें ऊन

आपुल्या ह्या झोपडींत
आणिलेस आश्वासित

आणि मज अनाथाचा केला प्रेमळ सत्कार
आलिंगिलें दोहीं भुजीं प्रेम वर्षिलें अपार

## मज पाहतांचि

मज पाहतांचि केलीं सगळ्यांनीं बंद दारें
झालें अंधकारमय हाय मज विश्व सारें

तेव्हां तूं मारूनि हांक
घेतलेस मज आंत

म्हणालास भाऊ मज गाढ दिलें आलिंगन
लाविला अंधारीं दीप सिंचिलें जीवनें वन

परी आलास तूं जेव्हां मजकडे दैन्यवाणा
लाविलीं मी दारें माझीं बोललों कठोर नाना

आणि तूं साडूनि श्वास
हाय निघूनि गेलास

फिरूनि न भेटलास आलास न मजकडे
पश्चात्तापें दग्ध माझें ऊर आतां धडधडे

## त्रुटित धारा

—१—

मोहर आला आंब्याला भरघोस
भरला उन्मद सुगंध कोसोकोस
कोकिळ त्याच्या फांदीवरतीं बसुनी
चिरंतनास्तव हाय करी आक्रोश

—२—

बागेमधलीं फुलें सुकूनी जाती
गळुनी पडती प्रेमाचीं मधु नातीं
आणिक वाट्याला जो आला प्याला
फुटुनी त्याची अखेर होते माती

—३—

अनंत वस्तू भरलेल्या विश्वांत
सुंदर एकाहूनी एक नितांत
कुणास ठाउक कुठें जायचें त्यांना
रहायचें वा इथेंच मंजुळ गात

—४—

कशास करिशी यातायात फुका ही
ऐश्वर्याची दाखविशी नवलाई
यमराजाची वरुनी येतां हांक
एकहि यांतिल कामीं येणें नाहीं

—५—

असेल जर या जगांत दुःखचि सारें
आणि जीव हे मातिमधें मिळणारे
येती मग ह्या पिंजऱ्यांत कां पक्षी
अनंतांत जे स्वैरपणें उडणारे

—६—

जीव जगीं या अमूर्तांतुनी आला
मूर्तामध्यें बंद आणखी झाला
फिरुनि जायचें अमूर्तांत अपणास
विसरुन मौजेमध्यें दंग जहाला

—७—

रोज उगवती तारे आकाशांत
रोज दिवाकर सविता अस्ता जात
रंगभूमिवर येणें जाणें ऐसें
असे चालले जीवांचे दिनरात

—८—

गृहदारा धनमान तुझीं येथील
नाहिं कुणीही तेथें हीं येतील
ज्या देशामधिं तुला जायचें आहे
काय बरोबर तेथें तूं नेशील

## त्रुटित धारा

—९—

येथिल सारी केली तूं तजवीज
उणी न येथें तुजला कांहीं चीज
परंतु येथिल केली कां तूं सोय
व्हायची न झाल्यावर नीजानीज

—१०—

पुत्रकलत्रें शेजारी गणगोत
शेनी लाकुड तिरडी रुपया नोट
प्रेत जाळण्या केली छान तयारी
पुढच्या कुस्तिस शिवला कां लंगोट

—११—

तुटती आकाशांतिल सुंदर तारा
गळूनि पडतो गुलाबही फुलणारा
अंधारांतुन येतो मानव जीव
आणि निघूनी जातो जीवनवारा

—१२—

जीव अनंताचा एक प्रवासी
सराईत ह्या येतो उतरायासी
पुढें जायचें आपणास विसरूनी
दंग होउनी जातो हाय विलासीं

## त्रुटित धारा

—१३—

मानव म्हणजे मडकें हें मातीचें
छेद तयाला एक महा मरणाचें
क्षणांत जीवन गळुनी त्यांतुन जाई
तुकडे होती आणिक त्या मडक्याचे

—१४—

फुलली जीवांची फुलबाग विशाला
तींत एक तूं आलासी जन्माला
हंससि उगा कां काळमाळि येऊनी
खुडुनी घेइल तुजलाही फुलबाला

—१५—

मरणाच्या ह्या भीषण दारांतून
अनंतांत जे गेले इथुन निघून
येतिल का ते फिरुनि इथें राह्यास
जन्माचा दरवाजा हा उघडून

—१६—

जन्मामधुनी विश्वरंगमंचांत
प्रवेश करतो जीव प्रमोदें गात
करुनि आपुलें थोडें कांहीं काम
रडत करी प्रस्थान हाय मरणांत

—१७—

जगतांतिल हीं सुखें व्याधसंगीत
हरिण अम्ही भुलतसों तयास खुशींत
अडकुनी घेतों स्वतःस फाशीं त्याच्या
धडपड करितों नंतर सुटण्या व्यर्थ

—१८—

काळाच्या पोलादी पकडींतून
सुटला आहे इथें कधीं कां कोण
कौरव होते दुष्ट म्हणूनी मेले
पांडव गेले धुळींत आणि मिळोन

—१९—

जन्मापेक्षां मरण वाटतें छान
ज्ञानापेक्षां उत्तम खलु अज्ञान
जन्म म्हणुनि जो म्हणतों आपण येथें
मरण पूर्विंच्या जन्माचें तें जाण

—२०—

उघडें पुस्तक पडलेलें हें पुढतीं
पानें त्याचीं वायूनें फडफडती
डोळे बघती लोकांचें हें नित्य
किन्तु न कोणी उचलुन त्याला पढती

—२१—

निळ्या नभाच्या फलकावरतीं कोणी
उदाहरण ठेवितो सदैव लिहोनी
एकहि मानव सोडवीत तें नाहीं
रविझाडू मग टाकी त्यास पुसोनी

—२२—

निळ्या ताणल्या ह्या पडद्याच्या मागें
करुण सूर हे काढी कोण विरागें
ऐकुन होई हृदयाचें मम पाणी
न ऐकतांही हृदय जळूं हें लागे

—२३—

तंत्रींवांचुन ध्वनि हे कोठुन येती
हृदय कुठेंतरि हाय ओढुनी नेती
वाटे थोडा जों न विसावा त्यास
तोंच सोडुनी खालीं ढकलुन देती

—२४—

संसाराचा अनंत पारावार
शोध बुडता जीव त्यांत आधार
जें जें हातीं धरतों तें तें बुडतें
करी समोंतीं नीरच एक विहार

मराठी ग्रंथ संग्रहालय
ठाणे
क्र. ..... ग. .......
ता. ..........
त्रुटित धारा

—२५—

अज्ञाताचा नाद वदे जीवास
शोधितोस जें तें तर असे तुझ्यांत
तरिहि धुंडितो जीव तया बाहेर
निघुन जाति अन् ठरलेले दिनरात

—२६—

कोण निजवितो मजला सायंकाळीं
जागें करितो आणिक कोण सकाळीं
बाग लाविली ज्यानें ही रमणीय
कुठें असे तो कलावन्त वनमाळी

—२७—

अहा तयाच्या फुलमाळांचा वास
जात असे हा विश्वांतून उतास
परी करंटा मानव धरीं उराशीं
सुकली नीरस निर्माल्यांची रास

—२८—

दिवसयामिनी येती आणिक जाती
घडा फुटूनी होते त्याची माती
घरामधें जें होतें खेळत वित्त
राहेना त्यापैकीं कांहीं हातीं

त्रुटित धारा

—२९—

पैशाकरितां खपतो मानव खूप
पैशापुढतीं जाळि जिवाचा धूप
मानव हृदयामधें मारुनी बरची
निसटुन जाई पैसा तो गुपचूप

—३०—

इथेंच आहे खळबळ सुखदु:खांची
इथेंच भाषा जन्माची मरणाची
किंतु महासागरीं मिळाल्यावरतीं
जिकडे तिकडे जीवन एक विहासी

—३१—

घोडे झाले पहा तुझे बेफाम
काय पाहशी लवकर खेंच लगाम
मोडतील ते मोलाची तव गाडी
आणि तुझ्यासह करितिल पूर्णविराम

—३२—

पृथ्वीवरती दिला नभाचा तंबू
जागोजागीं भरलें शीतल अंबु
यास्तव आम्हीं मजेंत नेता वेळ
पितों मधूचे चंबूवरतीं चंबू

—३३—

विश्वसिंधुच्या पल्याड जायासाठीं
जीव जन्मवरि करितो आटाआटी
चित्त गुंततें विषयांच्या जाळ्यांत
मधेंच होते आणि नाव उफराटी

—३४—

दोन दिवस जग बघण्या येतो प्राणी
भटकुन भटकुन होतो तो दिनवाणी
विश्रांतीस्तव झुरतो रात्रंदिवस
तेल संपता विझते अन् दिवलाणी

—३५—

आकाशाच्या निळया तबकडीवरतीं
रविचंद्रांचे निशिदिनिं काटे फिरती
जगताचें हें घड्याळ अपुले चाले
जीव तयाला बघती परी न बघती

—३६—

घोडा अपुला सोडुनिया भरधांव
आणि मिशीवर ऐटिंत देउनि ताव
शत्रूवरतीं तुटून पडतो वीर
मेला तरिही म्हणतो झालें नांव

त्रुटित धारा

—३७—

तेल संपलें जळुनी गेली वात
प्रकाश गेला मिळून अंधारांत
दिवा लावण्या ओढुनि काड्या जीव
पोळुन घेतो उगीच अपुले हात

—३८—

जगांत असशी तूं तर एक गुलाम
जें जें येइल तें कर मुकाट काम
समजत असशिल जर अपणाला राजा
थोड्यांतच लागेल म्हणावा राम

—३९—

भरुनि ठेवितो अमृताचा मधु पेला
प्रभातकालीं कुणी तरी अलबेला
परंतु मानव खुशाल खोलीमध्यें
ऊबदार शय्येवर असे निजेला

—४०—

चकाकतें तें नसतें सर्वच सोनें
न विश्वसावें बाह्यावरतीं कोणें
असत्य फिरतें सत्याच्या वेषांत
जाणुनि हें सुकृतींनो सावध होणें

—४१—

जें झालें तें शोकानें नच परते
तुटली तारा पुनरपि जाइ न वरतें
गुलाबसुम जें सुकुनि एकदां गेलें
मेघजलानें देखिल तें नच फुलतें

—४२—

मरण चुकवितां येत कुणाला नाहीं
करुनि काय मग उगिच जिवाची लाही
व्हायाचें तें झालें हें समजोनी
कार्य कराया अपुलें सत्वर जाईं

—४३—

शुद्ध मनानें जीवन अपुलें नेईं
राखीं उत्साहाची ज्योती देहीं
आणि पूर्णचंद्रापरि चारित्र्याची
ज्योत्स्ना विश्वीं अपुली विलसूं देईं

—४४—

मनुष्य अपुल्या हातानें पशु बनतो
थडगें अपुलें आपण येथें खणतो
जुळवुन पैसे थोडे बहुत खिशांत
जीवन केलें सफल आणखी म्हणतो

त्रुटित धारा

—४५—

अंगावर पोशाख ओढला शोक
भोग भोगिले जन्मवरी बिनधोक
राखुनि जो ठेविला दुराणी भाला
अखेर त्याचें हाय मोडलें टोक

—४६—

नव्हती येथें पूर्वी जानपछान
पुढें न राहिल येथिल कांहीं ज्ञान
पलीकडे जें अनंत कोणी आहे
केवळ त्याचें जाणुनि घे महिमान

—४७—

आहे किंवा नाहीं काहिं न कळतें
कशासाठिं तरि जीवन हें हळहळतें
अंधारांतच उजेड आहे म्हणती
उजेडांतही ज्योत तमाची जळते

—४८—

अम्हास नाहिंत पंख म्हणूनी आम्ही
पतंग मौजेनें उडवीतों व्योमीं
आणिक आहों पुरते मूर्ख म्हणून
करितों ज्ञानाचा बकवाद निकामी

—४९—

टाक मालवुन दिवा तुझा अक्कलेचा
खा मग अंधारांत खऱ्याच्या ठचा
धकाधकीचा असे मामला भाई
टिकायचा नच येथें लेचापेचा

—५०—

कळत न मजला कांहीं—आहे मान्य
उगिच नासणें शाई—आहे मान्य
जलीं बुडबुडा उठतो बघतां बघतां
आणिक फुटुनी जाई—आहे मान्य

—५१—

क्षणिक सुखाच्या जीव लागती मागें
दुःख तयांच्या मागें शाश्वत लागे
सुख तर जातें हातांतुन निसटून
पडति तोंडघशि तरिहि न होती जागे

—५२—

नसे घडीचा मुळीं भरवसा येथें
देहांचीं ह्या क्षणांत होतीं प्रेतें
करायचें तें करुनि टाक अविलंबें
संधि आजची उद्यां पुन्हां ना येते

त्रुटित धारा

—५३—

खूप वाचलीं बुकें आजवर जाडीं
कमाविली विद्वत्ता आणिक गाढी
अनेक विद्वानांसह केली चर्चा
न लाभली ज्ञानाची एकहि काडी

—५४—

देवापुढतीं पेटविली उदबत्ती
आणिक शृंगारिला भूषणें हत्ती
मिरवणूक काढिली महा थाटानें
श्रीमंतीची जाहिरात ही सस्ती

—५५—

तुझीं मंदिरें उभारिलीं जीं कांहीं
फिरविति केवळ पापांची ती द्वाही
दंभ ढोंग कीर्तीची पोकळ हाव
विटाविटांतुन त्यांच्या गाजत राही

—५६—

गुरें परतती गेहीं संध्याकाळीं
किलबिलते खगरवें दाट वनजाळी
नसे कुठेंही मजला येथ निवारा
रात्र काढणें रस्त्यावरतीं काळीं

—५७—

देवळांत बघ घंटा वाजूं लागे
रानोरानीं पक्षी होती जागे
घोड्यावरतीं मारुन बैठक पक्की
टांच देउनी वेगें होई आगे

—५८—

मस्तकास लावूनी हात सखेद
जुने पुराणे कशास बघसी वेद
कर्तव्याच्या जळत्या अग्नीमाजी
सुरूं करीं अजि नैराश्याचा मेध

—५९—

उदयगिरीच्या शिखरीं सविता आला
गेलें अंधाराचें राज्य लयाला
घेऊनि हातीं अहा फुलांची परडी
स्वागतास ही जाई निसर्ग—बाला

—६०—

प्रियालोचनी असे विषारी भाला
अधरिं साठली आणि इराणी हाला
प्रेमी अपुला प्राण तिच्यावर वाही
सरळ आणखी पोंचे तो स्वर्गाला

—६१—

शिशिर ऋतूचा चाले हिममय वारा
गळे द्रुमांचा पर्ण पिसारा सारा
व्याकुळ आणिक होई मानस माझें
हृदयीं व्यापे श्याम निराशाधारा

—६२—

सत्य काय तें अजुनि न मजला कळलें
आयुष्याचें बिंब खालतीं ढळलें
मृत्युमंदिरीं वाजे सायंघंटा
मानव केवळ अंधारीं धडपडले

—६३—

जिकडे जातों तिकडे निर्जल रेती
वरुन रवीचे किरण यातना देती
प्राण तृषेनें झाले व्याकुळ माझे
अश्रु तरीही ह्या हत नयनिं न येती

—६४—

आकाशाचें कमीच आहे मान
पृथ्वी म्हणजे ढेकुळ एक लहान
पंचमहाभूतांवर माझी सत्ता
मनीं मानवा खुशाल ऐसें मान

ग्रहालय ठाणे



—६५—

अपराधांची मी तर आहे खाण
अज्ञानाची मुळींच नाहीं वाण
आणिक धरतों उद्धाराची आशा
मूर्खावरिही करी खरोखर ताण

—६६—

निष्फळ सारे येथिल धर्मग्रंथ
कुचकामाचे सारे संतमहंत
पापकर्म पाप्यांचें थांबविण्याला
क्रूर काळही समर्थ नाहीं हंत

—६७—

प्रभो तुझ्या मी नालायक करुणेस
घालुनि वरतीं सभ्य शिष्टतम वेष
धूळ फेकिली डोळयांवर जगताच्या
आंत राखिला आणि नीच उद्देश

—६८—

केलीं किति मी पापें नाहीं गणती
जळत ठेविली स्वार्थाची नित पणती
जुमानिलें मी प्रभो हाय तुज नाहीं
क्षमा कशी मग मागूं तुजसी अणखी

—६९—

तुझा म्हणाया वाटे मजला लाज
केलें नाहीं एक चांगलें काज
जगास केवळ भारभूत मी झालों
आलों तुझिया पायापाशीं आज

—७०—

सेवेची अति जरूर होती ज्यांस
उलट तयांना दिला हाय मी त्रास
आणि दुर्जनांची मी केली सेवा
पात्र खरोखर प्रभो तुझ्या रोषास

—७१—

कोणापाशीं असे विपुल धनमान
कोणापाशीं भक्ती कोणा ज्ञान
तुला द्यावया नाहीं यांतील कांहीं
पापांची मजपाशीं केवळ खाण

—७२—

दिनभर केली निष्फळ धावाधाव
शमली नाहीं मानधनांची हाव
क्षितिज कुणाच्या हातीं येणें नाहीं
शांतिद केवळ एक प्रभूचें नांव

—७३—

दुःखी माझें हृदय कुणाला वाहूं
कढत असूनीं आणि कुणाला न्हाऊं
माझ्या धूमिल जळत्या निश्वासांनीं
प्रभो कसें तव चरण कमल हें पाहूं

—७४—

जन्मवरी मी दुःख दिलें दीनांस
गरीब लुटुनी केले चैन विलास
दैन्य तयांचें बघुनी हंसलों खूप
मिळवुं कसा मग प्रभो तुझा विश्वास

—७५—

सदा वागलों दीन जनांशीं वाम
नृशंस जुलमी प्रशंसिले अविराम
मलिन अपावन माझ्या ह्या वाणीनें
प्रभो कसें तव गाऊं पावन नाम

## सुदिन

REFBK-0006418

सुदिन उगवला
तिमिर सारा यामिनींचा लोपला
जो निघूनि होता गेला
ह्या टाकुनि निज नावेला
तो कटीस कसुनी शेला
निपुण कर्णधार पातला